दैनिक
# हिंदू प्रकाशवार्ता

epaper.hinduprakashwarta.com
Web portal : hinduprakashwarta.com
PRGI No.: MHMAR/25/A2358
सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी

छत्रपती संभाजीनगर ❀ रविवार, दि. ०६ सप्टेंबर २०२६ ❀ वर्ष : १ ❀ अंक : १३७ ❀ पाने : ४ ❀ किंमत : ४ रू. ❀ Email : hinduprakashvarta@gmail.com ❀ Postal Regn. No. ABD/551/2026-2028


## राज्यातील परीक्षा पद्धतींचा फेरआढावा घेणार

मुंबई : राज्यातील सरकारी भरती परीक्षांच्या पारदर्शकतेवर आणि विश्वासार्हतेवर वारंवार प्रश्न उपस्थित होत असताना, राज्य सरकारने संपूर्ण परीक्षा पद्धतीचाच साकल्याने फेरआढावा घेण्याचा निर्णय घेतला आहे. प्रश्नपत्रिका तयार करण्यापासून ती उमेदवारांच्या हाती पडेपर्यंतची प्रक्रिया, परीक्षा केंद्रांची सुरक्षा, तंत्रज्ञानाचा वापर, बनावट उमेदवार, प्रश्नपत्रिका फुटीचे प्रकार, प्रतिबंधित इलेक्ट्रॉनिक साधनांचा वापर आणि निकालापर्यंतच्या संपूर्ण प्रक्रियेचा अभ्यास करण्यासाठी उच्चस्तरीय समिती स्थापन करण्यात आली आहे.

## डान्स क्लासला जाण्यावरून पती-पत्नीत वाद; मारहाणीत पत्नीचा मृत्यू

**नागपूर :** डान्स क्लासला जाण्याच्या किरकोळ कारणावरून झालेल्या वादातून मद्यधुंद पतीने पत्नीला बेदम मारहाण केल्याची आणि उपचारादरम्यान तिचा मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना नागपुरात घडली आहे. याप्रकरणी पोलिसांनी आरोपी पतीला अटक केली असून त्याच्याविरोधात हत्येचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यामिनी कृष्ण लाल यादव (३८) असे मृत महिलेचे नाव असून, कृष्ण लाल यादव (४१) असे आरोपी पतीचे नाव आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, यामिनी आणि कृष्ण लाल हे नागपुरात त्यांच्या दोन मुलांसह राहत होते.

# शिवना येथे मोकाट कुत्र्यांचा सुळसुळाट; शाळकरी विद्यार्थ्यांमध्ये भीतीचे वातावरण

## शाळेत ये-जा करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या मागे धावतात कुत्रे; ग्रामपंचायतीने तातडीने ठोस उपाययोजना करण्याची मागणी

हिंदू प्रकाशवार्ता : सय्यद जमिरोद्दीन

**अजिंठा प्रतिनिधी :** सिल्लोड तालुक्यातील शिवना गावात मोकाट कुत्र्यांचा सुळसुळाट वाढल्याने नागरिकांसह शाळकरी विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे. विशेषतः जिल्हा परिषद शाळा आणि सलीम उर्दू हायस्कूलमध्ये जाणाऱ्या विद्यार्थ्यांच्या मागे मोकाट कुत्रे धावत असल्याने विद्यार्थ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. लहान मुले घाबरून पळत असल्याने एखादी दुर्घटना घडण्याची शक्यता नाकारता येत नाही.

गावातील मुख्य रस्ते, गल्लीबोळ, शाळांच्या परिसरासह विविध ठिकाणी मोकाट कुत्र्यांचे टोळके फिरताना दिसत आहेत. सकाळी विद्यार्थी शाळेत जात असताना तसेच शाळा सुटल्यानंतर घरी परतताना कुत्रे त्यांच्या मागे धावत असल्याचे चित्र दिसून येत आहे. त्यामुळे पालकांमध्येही आपल्या मुलांच्या सुरक्षिततेबाबत चिंता वाढली आहे.

**विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर :** जिल्हा परिषद शाळा आणि सलीम उर्दू हायस्कूलमध्ये परिसरातील अनेक विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. दररोज पायी शाळेत जाणाऱ्या विद्यार्थ्यांना मोकाट कुत्र्यांचा सामना करावा लागत आहे. काही विद्यार्थी कुत्र्यांच्या भीतीने रस्त्यावरून धावत सुटतात. अशावेळी वाहनांची वर्दळ असल्याने अपघात होण्याचीही शक्यता आहे.




मोकाट कुत्र्यांच्या टोळक्यांमुळे केवळ विद्यार्थ्यांनाच नव्हे तर महिला, ज्येष्ठ नागरिक, शेतकरी तसेच दुचाकीस्वारांनाही त्रास सहन करावा लागत आहे. रात्रीच्या वेळीही कुत्र्यांचे टोळके रस्त्यावर फिरत असल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे.

**पाळीव कुत्र्यांनाही मोकळे सोडले जाते :** मोकाट कुत्र्यांसोबतच काही नागरिकांकडून पाळीव कुत्र्यांनाही सार्वजनिक ठिकाणी मोकळे सोडले जात असल्याने समस्या आणखी वाढत आहे. पाळीव कुत्र्यांच्या मालकांनी आपल्या कुत्र्यांना घराबाहेर मोकळे सोडू नये आणि त्यांची योग्य काळजी घ्यावी, अशी मागणी ग्रामस्थांकडून होत आहे.

**ग्रामपंचायतीने तातडीने उपाययोजना करावी :** एखादी मोठी दुर्घटना घडल्यानंतर उपाययोजना करण्यापेक्षा त्यापूर्वीच मोकाट कुत्र्यांच्या समस्येवर ठोस उपाय करणे आवश्यक आहे. ग्रामपंचायतीने तातडीने बैठक घेऊन मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त करण्यासाठी संबंधित विभागाच्या मदतीने योग्य ती कार्यवाही करावी. तसेच शाळांच्या परिसरात विशेष लक्ष देऊन विद्यार्थ्यांची सुरक्षितता सुनिश्चित करावी, अशी मागणी पालक व ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे. विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा गंभीर प्रश्न लक्षात घेता ग्रामपंचायतीने या समस्येकडे तातडीने लक्ष देऊन ठोस निर्णय घ्यावा, अशी जोरदार मागणी होत आहे.

## थोडक्यात वार्ता

### स्मार्ट मीटरने वीज बंद झाली, तरी चोरीने वापर सुरूच ! जळगावात 28 जणांवर गुन्हे

**जळगाव :** थकीत वीजबिलामुळे स्मार्ट मीटरद्वारे वीजपुरवठा आपोआप खंडित झाल्यानंतरही अनधिकृतपणे वीज जोडणी करून वापर करणाऱ्या ग्राहकांविरोधात महावितरणने जळगाव विभागात धडक मोहीम सुरू केली आहे. ऑगस्ट महिन्यात राबविण्यात आलेल्या या विशेष मोहिमेत तब्बल 28 ग्राहक वीज चोरी करताना आढळून आले. या सर्वांविरोधात भारतीय विद्युत कायद्याच्या कलम 135 अंतर्गत विविध पोलिस ठाण्यांमध्ये गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. या कारवाईत तब्बल 11 हजार 606 युनिट वीजचोरी उघडकीस आली असून, महावितरणचे अडीच लाखांहून अधिक रुपयांचे आर्थिक नुकसान झाल्याचे समोर आले आहे. स्मार्ट मीटर बसविण्यात आलेल्या ग्राहकांचा वीजपुरवठा थकबाकीमुळे ‘ऑटो डिस्कनेक्ट’ केला जातो. म्हणजेच थकीत बिलामुळे वीजपुरवठा आपोआप बंद होतो. ग्राहकाने थकीत वीजबिल भरल्यानंतर वीजपुरवठा पुन्हा सुरू करण्याची सुविधाही उपलब्ध आहे. मात्र, काही ग्राहकांनी बिलाचा भरणा न करताच खंडित केलेली वीजजोडणी स्वतःहून पुन्हा जोडली आणि अनधिकृतपणे वीज वापरण्यास सुरुवात केली. ही बाब लक्षात आल्यानंतर जळगाव विभाग कार्यालयाने विशेष तपासणी मोहीम हाती घेतली.

### प्रारूप मतदार याद्यांचे राजकीय पक्षांना वितरण

**अहिल्यानगर :** विशेष सखोल पुनरीक्षण मोहीम-२०२६ अंतर्गत अहिल्यानगर जिल्ह्यातील १२ विधानसभा मतदारसंघांच्या नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या प्रारूप मतदार याद्यांचे मान्यताप्राप्त राजकीय पक्षांना वितरण करण्यात आले. उपजिल्हा निवडणूक अधिकारी सुनील गाढे यांच्या हस्ते भारतीय जनता पक्षाचे उत्तर विभागाचे जिल्हाध्यक्ष दिलीप भालसिंग, दक्षिण विभागाचे जिल्हाध्यक्ष नितीन दिनकर तसेच शहराध्यक्ष अनिल मोहिते यांनी प्रत्यक्ष उपस्थित राहून प्रारूप मतदार याद्या स्वीकारल्या. शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र दळवी व उपाध्यक्ष रावजी नांगरे यांनीही याद्या स्वीकारल्या. भारतीय राष्ट्रीय काँग्रेस तसेच राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार) यांच्या वतीने जिल्हाध्यक्षांचे प्राधिकृत प्रतिनिधींनी प्रारूप मतदार याद्या घेतल्या आहेत. याशिवाय बहुजन समाज पक्ष, महाराष्ट्र नवनिर्माण सेना, शिवसेना (शिंदे गट) आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने याद्यांच्या संगणकीकृत प्रती यापूर्वीच घेण्यात आल्याची माहिती उपजिल्हा निवडणूक अधिकारी सुनील गाढे यांनी दिली.

### मुंबईत 9 ते 23 सप्टेंबरदरम्यान 5 पेक्षा जास्त लोकांच्या जमावावर कडक निर्बंध

**मुंबई :** मुंबईत ९ ते २३ सप्टेंबर या कालावधीत कडक प्रतिबंधात्मक निर्बंध लागू करण्यात आले आहेत. शांतता भंग, सार्वजनिक सुव्यवस्थेत अडथळा आणि जीवित अथवा मालमत्तेला धोका निर्माण होण्याची शक्यता विचारात घेऊन मुंबई पोलिसांनी हा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. मुंबईचे पोलीस उपआयुक्त (ऑपरेशन्स) आणि बृहन्मुंबईचे कार्यकारी दंडाधिकारी अकबर पठाण यांनी महाराष्ट्र पोलीस कायदा, १९५१ च्या कलम ३७(३) सह कलम १० (२) अन्वये हे आदेश जारी केले आहेत. या १५ दिवसांच्या कालावधीत ५ किंवा त्यापेक्षा जास्त व्यक्तींच्या एकत्र येण्यावर आणि मिरवणुका काढण्यावर बंदी असेल. तसेच मिरवणुकीदरम्यान लाऊडस्पीकर, ॲम्प्लीफायर, संगीत बँड आणि फटाक्यांच्या वापरावर पूर्णपणे बंदी घालण्यात आली आहे. मात्र, नागरिकांचे दैनंदिन जीवन, धार्मिक आणि व्यावसायिक व्यवहार सुरळीत चालावेत यासाठी काही महत्त्वाच्या सवलती देण्यात आल्या आहेत.

# पुण्यात डीजेचा दणदणाट भोवला! नियम मोडल्याने कारवाई; साऊंड सिस्टिम जप्त




पुणे : पुण्यात दहीहंडी उत्सवाचा उत्साह सुरू असतानाच ध्वनी प्रदूषणाविरोधात पोलिसांनी कारवाईचा बडगा उगारला आहे. बिबवेवाडी परिसरातील श्रीकृष्ण तरुण मंडळाविरोधात परवानगीपेक्षा अधिक लाऊडस्पीकर लावल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी मंडळाची साऊंड सिस्टिमही जप्त केली आहे.

पोलिसांच्या माहितीनुसार, दहीहंडी कार्यक्रमासाठी मंडळाला लाऊडस्पीकर वापरण्याची परवानगी देण्यात आली होती. मात्र, या परवानगीच्या अटींचे उल्लंघन करत मंडळाने 4 बेस आणि 4 टॉपऐवजी तब्बल 8 बेस आणि 8 टॉप स्पीकर लावले. त्यामुळे परिसरात मोठ्या आवाजात ध्वनी प्रदूषण होत असल्याची बाब पोलिसांच्या निदर्शनास आली.

बिबवेवाडी ओटा येथील श्रीकृष्ण मंडळाने दहीहंडी उत्सवासाठी पोलिसांकडून परवानगी घेतली होती. मात्र, परवानगीमध्ये दिलेल्या नियमांचे पालन न करता अतिरिक्त साऊंड सिस्टिमचा वापर केल्याचा आरोप आहे. यामुळे नागरिकांना त्रास होत असल्याचे पोलिसांनी नमूद केले. दरम्यान, दहीहंडी आणि आगामी गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर पुणे पोलिसांनी ध्वनी प्रदूषणाच्या मुद्द्यावर कठोर भूमिका घेतली आहे. मोठ्या आवाजात डीजे किंवा लाऊडस्पीकर वाजवून नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कारवाईचा इशारा यापूर्वीच देण्यात आला आहे. सण-उत्सव साजरे करताना नियमांचे पालन करण्याचे आवाहन पोलिसांकडून करण्यात येत आहे. पुण्यात सध्या डीजे आणि ध्वनी प्रदूषणाचा मुद्दा चर्चेत असून, उत्सव आणि ध्वनी मर्यादा यावरून वादही सुरू आहे.

# गोविंदा आला रे आला!’; मुंबई-ठाण्यात दहीहंडीचा जल्लोष, ढोल-ताशांचा निनाद अन् गोविंदांचा जोश

मुंबई : ‘गोविंदा आला रे आला’च्या जयघोषात आणि ढोल-ताशांच्या गजरात मुंबई, ठाणे, नवी मुंबईसह राज्यभरात आज दहीहंडीचा जल्लोष आणि उत्साह पाहायला मिळाला. गोविंदा पथकांनी एकावर एक थर रचत दहीहंडी फोडण्याचे थरारक आव्हान स्वीकारले. ठाण्यात सकाळपासूनच दहीहंडी उत्सवाची लगबग सुरू झाली होती. विविध गोविंदा पथकांचे ढोल-ताशांच्या गजरात आगमन होताच परिसरात उत्सवी वातावरण निर्माण झाले. ‘गोविंदा आला रे’च्या घोषणांनी आणि पारंपरिक वाद्यांच्या तालाने शहर दुमदुमून गेले. (Dahi Handi 2026)



दहीहंडी फोडण्यासाठी गोविंदांनी मानवी मनोरे रचले. काही पथकांना पहिल्याच प्रयत्नात हंडी फोडण्यात यश आले, तर काही ठिकाणी थर कोसळल्यानंतर गोविंदांनी पुन्हा जोमाने मनोरे उभारले. त्यामुळे दहीहंडीच्या मैदानात चुरस आणि थरार पाहायला मिळाला.

लाखोंची बक्षिसे आणि विक्रमांची चुरस

यंदाच्या दहीहंडी उत्सवाचे प्रमुख आकर्षण म्हणजे मोठ्या रकमेची बक्षिसे आणि विक्रमांचे आव्हान. मानाच्या दहीहंड्यांवर लाखो रुपयांची बक्षिसे जाहीर करण्यात आली असून, ती पटकावण्यासाठी गोविंदा पथकांमध्ये चुरस पाहायला मिळाली. ठाण्यातील काही दहीहंड्यांसाठी तर ७१ लाख रुपयांपर्यंतच्या बक्षिसांची घोषणा करण्यात आली आहे.

मुंबई, ठाणे, नवी मुंबई आणि पुण्यातील प्रमुख दहीहंडी उत्सवांमध्ये सेलिब्रिटी आणि मान्यवरांची उपस्थितीही आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरली. त्यांच्या उपस्थितीमुळे गोविंदा पथकांचा उत्साह आणखी वाढला. ढोल-ताशांचा निनाद, गोविंदांच्या घोषणा आणि उंचच उंच मानवी मनोरे अशा उत्सवी वातावरणात यंदाची दहीहंडी रंगली. त्यामुळे मुंबई-ठाण्यातील रस्त्यांवर आज ‘मच गया शोर सारी नगरी रे...’ म्हणत गोविंदांच्या थरारक खेळीचा अनुभव पाहायला मिळाला.

# पालकमंत्री संजय शिरसाट, मंत्री अतुल सावे यांच्या हस्ते चार शिक्षकांचा गौरव

## शिक्षक दिनानिमित्त जिल्हा परिषदेतर्फे गुणवंत शिक्षकांना पुरस्कार; नाविन्यपूर्ण उपक्रमांचे कौतुक

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तावाढीसाठी सातत्यपूर्ण प्रयत्न, नाविन्यपूर्ण उपक्रमांची प्रभावी अंमलबजावणी आणि शाळेच्या सर्वांगीण विकासासाठी उल्लेखनीय योगदान देणाऱ्या छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील तीन शिक्षक व एका विषय शिक्षकाचा शिक्षक दिनानिमित्त पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला. पालकमंत्री तथा कॅबिनेट मंत्री संजय शिरसाट आणि कॅबिनेट मंत्री अतुल सावे यांच्या हस्ते या शिक्षकांना पुरस्कार प्रदान करण्यात आले.




जिल्हा परिषद शिक्षण विभागाच्या वतीने आयोजित या गौरव सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी जिल्हा परिषद अध्यक्ष अविनाश पाटील गलांडे होते. यावेळी जिल्हा परिषद उपाध्यक्ष जितेंद्र जयसवाल, शिक्षण सभापती अनिता मोठे, बांधकाम सभापती सचिन गरड, समाजकल्याण सभापती बालाजी सोनटक्के, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी वासुदेव सोळुंके, एसएससी बोर्डाचे अध्यक्ष अनिल साबळे, प्राथमिक शिक्षणाधिकारी संघरत्न सरोदे, माध्यमिक शिक्षणाधिकारी अश्विनी लाठकर यांच्यासह उपशिक्षणाधिकारी, गटशिक्षणाधिकारी, विस्तार अधिकारी, विविध शिक्षक संघटनांचे पदाधिकारी, मुख्याध्यापक आणि शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राथमिक शिक्षणाधिकारी संघरत्न सरोदे यांनी केले. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शिक्षकांकडून राबविण्यात येणाऱ्या नाविन्यपूर्ण उपक्रमांचे महत्त्व त्यांनी अधोरेखित केले. शिक्षकांच्या उत्कृष्ट कार्याची दखल घेऊन त्यांचा सार्वजनिकरित्या गौरव केल्याने जिल्ह्यातील शिक्षकांमध्ये नव्या उमेदीने काम करण्याची प्रेरणा निर्माण होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

गुणवत्तापूर्ण शिक्षण, नाविन्यपूर्ण अध्यापन आणि विद्यार्थीकेंद्रित उपक्रमांच्या माध्यमातून जिल्ह्याची शैक्षणिक गुणवत्ता अधिक उंचावण्यासाठी शिक्षकांचे योगदान महत्त्वपूर्ण आहे. उत्कृष्ट कार्य करणाऱ्या शिक्षकांचा सन्मान हा इतर शिक्षकांसाठी प्रेरणादायी ठरणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

शिक्षक हे समाजाच्या भावी पिढीचे शिल्पकार असून त्यांच्या समर्पित कार्याचा सन्मान म्हणजे गुणवत्तापूर्ण शिक्षणाच्या प्रयत्नांचा सन्मान आहे. शिक्षकांच्या कार्याला प्रोत्साहन देण्यासाठी भविष्यातही अशा उपक्रमांना चालना देण्याचा मानस शिक्षण विभागाच्या वतीने व्यक्त करण्यात आला.

# शिक्षक दिनानिमित्त PM मोदींचा शिक्षकांशी मनमोकळा संवाद

नवी दिल्ली : शिक्षक दिनाचे औचित्य साधून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नवी दिल्लीतील आपल्या निवासस्थानी राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार विजेत्यांशी मनमोकळा संवाद साधला. या वेळी शिक्षण पद्धती, मुलांचे वाढते मोबाईलचे व्यसन, अमली पदार्थांचा धोका आणि मुलांमधील सुप्त गुण यांसारख्या महत्त्वाच्या विषयांवर हलक्या-फुलक्या वातावरणात चर्चा झाली. संवादादरम्यान एका शिक्षिकेने सांगितले की, त्या शाळेत मुलांकडून मुलाखती घेण्याचा सराव करून घेतात. यावर पंतप्रधान मोदी हसून म्हणाले, "म्हणजे ही मुले घरी जाऊन पालकांचीही मुलाखत घेत असतील! 'आज हाच स्वयंपाक का केला ? एवढा खर्च का झाला?' असे प्रश्न विचारून त्यांनी पालकांना त्रस्त केले असेल." पंतप्रधानांच्या या विनोदावर सर्वांमध्ये एकच हशा पिकला. वक्तृत्व शिकवणाऱ्या एका शिक्षिकेला पंतप्रधानांनी विचारले, "जर मी तुमचा विद्यार्थी असतो, तर मला चांगला वक्ता बनण्यासाठी तुम्ही काय सल्ला दिला असता?" यावर शिक्षिकेने "आत्मविश्वास हवा" असे सांगितले, पण पंतप्रधान समोर असल्यामुळे त्या स्वतःच थोड्या घाबरल्या. यावर मोदींनी मिश्किलपणे विचारले, "म्हणजे उत्तम वक्ता बनण्यासाठी वलय (Aura) नसले पाहिजे का? नाहीतर लोक भाषण ऐकण्याऐवजी फक्त वलयाकडेच पाहत राहतील."

प्रत्येक मूल अभ्यासातच हुशार असेल असे नाही, असे सांगत पंतप्रधानांनी शिक्षकांना आवाहन केले की त्यांनी प्रत्येक मुलामधील वेगळी ताकद आणि आवड ओळखली पाहिजे. पुस्तकी ज्ञानापलीकडे जाऊन मुलांच्या कलागुणांना वाव देणे अत्यंत गरजेचे असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. चर्चेदरम्यान एका शिक्षिकेने 'एकलव्य मॉडेल शाळां'चे कौतुक केले.




# माहेर गेलेल्या पत्नीच्या रागातून बापानेच रचला कन्येच्या अपहरणाचा हर्सूल परिसरात बनाव

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर

हर्सूल परिसरातील एका खळबळजनक प्रकरणात मुलीच्या अपहरणाचा बनाव रचणाऱ्या स्वतःच्याच पित्याचा पर्दाफाश झाला आहे. पत्नीसोबत सुरू असलेल्या वादामुळे ती माहेरी राहत असल्याच्या रागातून त्याने हा बनाव रचल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे.

हर्सूल पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या गुन्ह्यानुसार कलम १३७(२) बीएनएस, फिर्यादी रितेश रमेश राठोड (वय २१, रा. रहाळपट्टी तांडा, जटवाडा रोड, हर्सूल) याने ४ सप्टेंबर २०२६ रोजी सायंकाळी साडेपाच वाजता आपली दोन वर्षांची मुलगी दिव्यांशी हिचे अज्ञात व्यक्तीने घरून अपहरण केल्याची तक्रार दिली होती. या प्रकरणी हर्सूल पोलिसांनी तातडीने गुन्हा दाखल करत पोलीस निरीक्षक यांच्या आदेशानुसार पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक लामा यांच्याकडे वर्ग केला होता.

तपासादरम्यान पोलिसांनी कसून चौकशी केली असता, पतीचे पत्नीसोबत सातत्याने वाद होत असल्याने ती बऱ्याच दिवसांपासून माहेरी राहत होती. याच गोष्टीचा राग मनात धरून रितेश राठोड याने स्वतःच मुलीच्या अपहरणाचा बनाव रचल्याचे समोर आले आहे. पोलिसांच्या तपासात सत्य उघडकीस आल्याने खळबळ उडाली असून या प्रकरणी पुढील कायदेशीर कारवाई सुरू आहे.

# रक्षाबंधनानिमित्त मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना भाजपा नेत्या प्रीतीताई जैस्वाल यांनी बांधली राखी

हिंगोली/ गोपाल सातपुते

**हिंगोली :** रक्षाबंधनाच्या पावन पर्वानिमित्त सौ. प्रीतीताई जैस्वाल यांनी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री मा. ना. श्री. देवेंद्र फडणवीस साहेबांची मुंबई येथे सदिच्छा भेट घेतली. यावेळी प्रीतीताईंनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस साहेबांना राखी बांधून रक्षाबंधनाच्या हार्दिक शुभेच्छा दिल्या.



भाऊ-बहिणीच्या प्रेम, विश्वास आणि आपुलकीचे नाते अधिक दृढ करणाऱ्या या भावनिक प्रसंगी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस साहेबांनीही प्रीतीताईंना रक्षाबंधनाच्या शुभेच्छा दिल्या.

या सदिच्छा भेटीदरम्यान वसमत विधानसभा मतदारसंघातील विविध विकासकामे तसेच नागरिकांच्या महत्त्वाच्या प्रश्नांवर मुख्यमंत्री महोदयांशी सविस्तर चर्चा करण्यात आली. मतदारसंघाच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक असलेल्या विविध विषयांकडे मुख्यमंत्री फडणवीस यांचे लक्ष वेधून त्याबाबत सकारात्मक चर्चा करण्यात आली.

यावेळी बोलताना सौ. प्रीतीताई जैस्वाल म्हणाल्या, “रक्षाबंधन हा प्रेम, विश्वास आणि संरक्षणाच्या पवित्र नात्याचा सण आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस साहेबांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्राच्या विकासाला गती मिळत असून, त्याचबरोबर वसमत विधानसभा मतदारसंघाच्या सर्वांगीण विकासासाठी सातत्याने प्रयत्न करत राहणार आहे.”

वसमत मतदारसंघातील पायाभूत सुविधा, विकासकामे आणि नागरिकांच्या विविध प्रश्नांना प्राधान्य देत शासनाच्या माध्यमातून त्यांची प्रभावीपणे सोडवणूक करण्यासाठी पाठपुरावा सुरू ठेवण्याचा निर्धारही प्रीतीताई जैस्वाल यांनी व्यक्त केला.

रक्षाबंधनाच्या निमित्ताने झालेल्या या भेटीत स्नेह, आपुलकी आणि विकासाच्या विषयांची सांगड घालत वसमत मतदारसंघाच्या भविष्यातील विकासासाठी सकारात्मक वातावरण निर्माण झाले.

# सं पा द की य

## दहीहंडीच्या थरांवरून निर्माण झालेले प्रश्न

मुंबई आणि महाराष्ट्राच्या सांस्कृतिक पटलावर 'गोविंदा रे गोपाळा'चा गजर आणि 'ढाक्कू माक्कूम'च्या तालावर अवघ्या मुंबईत थरांवर थर रचत साजरा केला जाणारा दहीहंडी उत्सव हा केवळ एक सण राहिलेला नाही, तर तो तरुणांच्या अथांग उत्साहाचे आणि साहसाचे प्रतीक बनला आहे. दरवर्षीप्रमाणे यंदाच्या २०२६ च्या दहीहंडी उत्सवातही मुंबईतील विविध भागांत मानवी मनोरे रचून हंड्या फोडण्यासाठी गोविंदा पथकांमध्ये कमालीची स्पर्धा पाहायला मिळाली. मात्र, हा उत्साह आणि जल्लोष साजरा करताना सुरक्षिततेच्या अभावामुळे घडणाऱ्या अपघातांचे वास्तव पुन्हा एकदा चव्हाट्यावर आले आहे. शनिवारी दिवसभर चाललेल्या या उत्सवात उंचच उंच मनोरे रचताना अनेक ठिकाणी ते कोसळल्याच्या घटना घडल्या. परिणामी, मुंबई महानगरपालिका आणि शासकीय रुग्णालयांमध्ये रात्री ९ वाजेपर्यंत तब्बल १६८ जखमी गोविंदा उपचारासाठी दाखल झाले. यावरून हा साहसी खेळ खेळताना किती मोठा धोका पत्करावा लागतो, याची प्रचिती येते. या पार्श्वभूमीवर महानगरपालिकेने घेतलेली पूर्वतयारी अत्यंत स्तुत्य म्हणावी लागेल. शीव येथील लोकमान्य टिळक सर्वोपचार रुग्णालय, परळ येथील के.ई.एम. रुग्णालय, मुंबई सेंट्रल येथील नायर रुग्णालय तसेच १६ उपनगरीय रुग्णालयांमध्ये १०५ रुग्णशय्या आणि विशेष उपचार सुविधा सज्ज ठेवल्यामुळे अनेक जखमींवर वेळेवर उपचार करणे शक्य झाले. असे असले तरी, मानवी मनोरे रचताना होणाऱ्या चुका आणि सुरक्षेच्या पुरेशा साधनांचा (उदा. सेफ्टी बेल्ट, हॅममेट्स) अभाव यामुळे दरवर्षी शेकडो तरुण गंभीर दुखापतींचे शिकार होतात. संस्कृती आणि परंपरेचे जतन करताना तरुणांच्या जीवाशी खेळ होणार नाही याची काळजी घेणे गोविंदा पथकांच्या आयोजकांची तसेच शासन-प्रशासनाची संयुक्त जबाबदारी आहे. केवळ उपचाराची सो ् करून चालणार नाही, तर थरांची उंची मर्यादित ठेवणे आणि कडक सुरक्षा नियमांची अंमलबजावणी करणे काळाची गरज आहे, जेणेकरून आनंदाचा हा सण कोणाच्याही कुटुंबासाठी दुःखाचा ठरणार नाही.

# सखा कृष्ण हरि हा



कृष्ण ह्या दोन अक्षरांमधे सर्वांची मने खेचून घेण्याची प्रचंड ताकद आहे. अगदी कृष्ण विवरासारखी. कोणी त्याच्या रूपाकडे आकृष्ट होतात तर कोणी त्याच्या बाललीलांनी मोहित होतात. कोणी त्याच्या रासक्रीडेत रंगून जातात तर कोणी त्याच्या योगीश्वर रूपासमोर नतमस्तक होतात. कोणी त्याच्या नीरक्षीर विवेकाने अचंबित होतात तर कोणी त्याच्या गीतारूपी विवेक चिंतामणीचे तेज पाहून विस्मित होतात. अर्जुनाच्याच नव्हे तर साऱ्या मानवजातीच्या हाती आलेला हा गीतारूपी दिव्य चिंतामणी आजही अनेकांचे जीवन उजळवून टाकतो तर ज्यांना कृष्णाचा विवेक कळला नाही ते त्याला दूषणे देत का होईना पण त्याच्याच विचारात गुंतून पडतात.

विवेक म्हणजे योग्य अयोग्याचं सूक्ष्म ज्ञान, धर्म आणि अधर्माचा अचूक निवाडा. म्हणूनच विवेक हा स्थळ, काळ, प्रसंग आणि व्यक्तिसापेक्ष बदलत असतो. कृष्णाने पार्थाला धर्माची सोपी व्याख्या सांगितली. धर्म म्हणजे तरी काय? समाजातील थोर मंडळींचे आचरण म्हणजे धर्म. समाजातील बाकी लोक त्याचेच अनुकरण आणि अनुसरण करतात.

यद्यदाचरति श्रेष्ठस्तत्तदेवेतरो जनः ।

स यत् प्रमाणं कुरुते लोकस्तदनुवर्तते ।। 21 ।।(गीता अध्याय 3)

हेच माऊलींच्या शब्दात सांगायचे तर,

एथ वडिल जे जे करिती। तया नाम धर्मु ठेविती । तेचि येर अनुष्ठिती । सामान्य सकळ ।। हे ऐसे असे स्वभावे। म्हणोनी कर्म न संडावे । विशेषे आचरावे । लागे संती ।। (ज्ञानेश्वरी)

कृष्ण सर्व कर्म बंधनातून मुक्त होता. पण मार्गदर्शक म्हणून सारी प्रजा त्याच्याकडेच बघत होती हे लक्षात घेऊन कृष्णाने सदोदित अत्यंत काटेकोरपणे यम-नियमांचे पालन केले. इतकेच नाही तर पूर्वी कोणी केले नसेल इतके प्रत्येक काम उत्कृष्ट करून दाखविले.

नित्य नियमाने वागणाऱ्या न्यायी माणसालाही काही अपवादात्मक प्रसंगी नियम वाकवावे लागतात. बदलावे लागतात किंवा मोडावेही लागतात. ते स्वतःच्या स्वार्थासाठी नाही तर लोककल्याणाच्या उद्देशाने वाकवले असतील, बदलले असतील किंवा मोडले असतील तर तो अधर्म होत नाही. तर तोच योग्य धर्म ठरतो.

ज्याप्रमाणे भाजी, कापूस, सोने ह्या सर्व वस्तू एकाच तराजूने तोलून चालत नाहीत त्याप्रमाणेच सर्व लोकांना एकच नियम लावून चालत नाही. मिष्टान्न कितीही रुचकर असले तरी ते नुकत्याच जन्मलेल्या अर्भकाला किंवा रोग्याला अपायकारकच ठरते. कृष्णाच्या अनेक निर्णयांमधून त्याने धर्माचा सूक्ष्म विचार व त्याचा परम विवेकीपणा दाखवून दिला आहे. म्हणून वरवर विरोधाभास वाटणाऱ्या कृष्णाच्या कृतीमधून व्यापक जनकल्याणाचा उद्देश व नीतिमान जनतेचं रक्षण ह्या उद्दिष्टांचीच पूर्ती झाली आहे.

वैयक्तिक पातळीवर अत्यंत निर्मोही, निःस्वार्थ, निस्पृह आणि निरपेक्ष भावनेने काम करणारा कृष्ण राष्ट्राचा, धर्माचा विचार करतांना मात्र निर्मम आणि विशोक (शोकरहित) आहे. तेथे कुठलाही विकल्प त्याच्या मनात नाही.

कृष्णाच्या विचार आणि आचारातील सुसंगती श्रीविष्णुसहस्रनामात मोठी सुंदर रीतीने दाखवली आहे. त्याच्या विवेकी स्वभावाचे उचित वर्णन त्यात सापडते.

विष्णुसहस्रनामात वर्णन केल्याप्रमाणे भगवान कृष्ण `अमानी मानदो मान्यः' असा आहे. त्याला कोणाकडूनही कुठल्याही मानाची अपेक्षा नाही. इतरांना मात्र तो मान देतो. म्हणूनच सर्व लोकांमध्ये तो मान्य आहे. `अपमानं पुरस्कृत्य मानं कृत्वा च पृष्ठतः' म्हणजे अपमान पुरस्कारस्वरूप मानून, मान पाठीमागेच ठेवणारा कृष्ण इतरांना मात्र अत्यंत मान देणारा आहे. सुदाम्याच्या प्रेमाखातर अनवाणी धावत जाणारा कृष्ण , सुदाम्याचे पाय स्वहस्ते धुणारा कृष्ण आजही सर्व भारतीयांच्या हृदयात विराजमान आहे.

महाभारत युद्धात थोडासा वेळ मिळताच अर्जुनाच्या रथाच्या घोड्यांना ताजेतवाने करण्यासाठी चाबूक मुकुटात खोचून त्यांना अंघोळ घालणाऱ्या, खरारा करणाऱ्या, आणि अर्जुनाला रथात चढण्यासाठी स्वतः ओणवे वाकून त्याच्या पाठीवर पाय ठेऊन अर्जुनाला रथात चढायला मदत करणाऱ्या कृष्णाची मूर्ती सर्वांच्या डोळ्यासमोर आहे.

भीष्मांनी युद्धात कृष्णाला हाती शस्त्र धरायला लावीन अशी प्रतिज्ञा केल्यावर त्यांच्या प्रतिज्ञेसाठी आपली प्रतिज्ञा मोडणारा कृष्णही तितकाच विवेकी व लोभस आहे. त्यातून त्याने दोन गोष्टीही साधल्या. भीष्मांना शस्त्र खाली ठेवायचा संदेशही दिला तर भीष्मांशी लढायला कचरत असलेल्या अर्जुनामधे जिगीषा जागवण्याचे कामही केले.

शत्रूपक्षातील कर्णानेही आपल्या मृत्यूनंतर आपले क्रियाकर्म कृष्णाने करावे ही व्यक्त केलेली इच्छाही कृष्णाने मोठ्या आत्मीयतेने पूर्ण केली.

कृष्णाला मनोहरो जितक्रोधः संबोधलं आहे. स्वतःचा राग त्याने पूर्ण जिंकला आहे म्हणूनच त्याच्या चेहऱ्यावर कोणालाही मोहून टाकेल असे स्मित कायम झळकत असते. क्रोधावरील संयम किती लवचिक असावा, तो किती ताणावा आणि तो कुठे सोडावा ह्याचं उत्तम उदाहरण शिशुपालवध आहे. पांडवांच्या राजसूय यज्ञाच्या सांगता सभेत कृष्णाला अग्रपूजेचा मिळालेला मान पाहून संतापलेल्या शिशुपालाने हीन शब्दात कृष्णाची निर्भर्त्सना करायला सुरवात केली. त्याचे शंभर अपराध मोजत कृष्ण शांत होता. शेवटी भीष्माचार्यांचाही अपमान करणाऱ्या शिशुपालाला शांतपणे त्याचा एक एक अपराध सांगून मगच कृष्णाने त्याच्यावर सुदर्शन चक्राचा प्रयोग केला आहे.

कृष्ण धर्मगुप् म्हणजे धर्माचे रक्षण करणारा आहे, धर्मकृत् म्हणजे स्वतःच्या आचरणाने धर्म निर्माण करणारा आहे आणि धर्मी - म्हणजे धर्मानुसार वागणाराही आहे.

दुर्योधनाची मुलगी लक्ष्मणा ही कृष्णाच्या मुलाची सांबाची पत्नी असल्याने कौरव व पांडव दोघेही त्याचे नातेवाईकच होते. पण धर्माची बाजू घेणारा कृष्ण सुनीतीच्या मार्गावर चालणा ऱ्या पांडवांपाठी मेरूपर्वताप्रमाणे उभा राहिला.

नरकासुराच्या वधानंतर त्याच्या बंदिखान्यात खितपत पडलेल्या सोळा हजार स्त्रियांना ज्याकाळी समाजाने जवळ केले नसते त्यांना कृष्णाने सन्मानाने समाजाच्या मुख्य धारेत आणले. त्यांना पत्नीचा मान देणाऱ्या कृष्णाने नियम वाकवून धर्माला जास्त सहिष्णु बनविले.

कौरवांकडे शिष्टाईला जाणाऱ्या कृष्णाने द्रौपदीला `हे युद्ध होणारच आणि ह्या युद्धात तुझा प्रतिशोध पूर्ण होणारच' हे आश्वासन आधीच दिले होते. तरीही आडमुठ्या दुर्योधनाच्या तोंडून `मी सुईच्या टोकावर राहील एवढी भूमीही पांडवांना देणार नाही' हे वाक्य येणे गरजेचे होते. शिष्टाईच्या निमित्ताने सर्व महारथींशी संवाद साधत दुर्योधनाची मदार ज्यांच्या ज्यांच्यावर होती अशा कर्णासहित सर्वांचे मनोधैर्य खच्ची करून कृष्ण परतला. युद्धाआधीच अर्धी लढाई जिंकून आला. हा `वृषकर्मा' म्हणजे धर्माने वागणारा होताच पण `वृषाकृती' म्हणजे धर्माचं जणु सगुण रूपच होता. त्यामुळेच भीष्म, द्रोण, कर्ण, जयद्रथ, दुर्योधन वा दुःशासन असो वा कंस, जरासंध, नरकासूर असो. अश्वत्थामा असो वा कृप ! अधर्माची कास धरणाऱ्या प्रत्येकाला सरळमार्गाचा अवलंब न करता वरवर वाटणाऱ्या `अधर्म' मार्गाने वधून वा शासन करून कृष्णाने धर्मसंस्थापना केली आहे.

दुष्ट, दुर्जनांवर प्राणघातक प्रहार करण्यासाठी सर्व शस्त्र, अस्त्र आणि आयुधांनी सज्ज असा कृष्ण `सर्वप्रहरणायुध' (दुष्टांवर प्रहार करण्यास सतत सज्ज) असला तरी तो `अक्षोभ्य' आहे. कोणीही त्याला क्षुब्ध करु शकत नाही. त्याने दुष्टांना केलेले शासन हे कुठल्याही सूडबुद्धी, संताप, अहंकारातून झालेले नाही तर अत्यंत समतोल मनाने घेतलेला तो निर्णय आहे. म्हणूनच तो सर्वशस्त्रधारींमधे श्रेष्ठ म्हणजे `सर्वशस्त्रभृतांवरः' आहे.

भक्तांसाठी कुठलेही कष्ट सोसण्यास तयार असलेल्या कृष्णाचे वैराग्य पाहिल्याशिवाय त्याच्या विवेकाची पूर्ण कल्पना येत नाही. कंसवधानंतर मथुरेच्या किंवा द्वारकेच्या राज्याचेही राजेपद त्याने स्वीकारले नाही. वेळ पडल्यास विदुराघरच्या कण्याही परमानंदाने स्वीकारल्या तर द्रौपदीकडे भांड्याला चिकटलेल्या एका शितावर तो तृप्त झाला. कमलपत्रावर पडलेलं पाणी त्याला जराही न चिकटल्यामुळे हिऱ्यामोत्याप्रमाणे चमकते त्याप्रमाणे कशाचाही मोह नसलेला हा निर्मोही कुठल्याच बंधनात बांधला गेला नाही. शेवटच्या क्षणापर्यंत त्याच धैर्य, माधुर्य, विवेक जागृत होता. ``कृष्णा, तुम्हीही सारे यादव एकमेकात लढून मराल आणि एका अनाथासारखा तुला क्षुल्लक कारणाने मृत्यू येईल." ही गांधारीची महाभयंकर शापवाणी ऐकून सारे पांडवही जेथे भयाने थरथर कापू लागले तेथे कृष्णाने सुस्मित वदनाने तिचा शाप स्वीकारला. परीक्षितीला जीवनदान देणाऱ्या, पांडवांचं वेळोवेळी रक्षण करणाऱ्या कृष्णाने स्वतःला मिळालेला शाप व्यर्थ ठरावा ह्यासाठी काहीही प्रयत्न केले नाहीत. त्याच प्रमाणे उन्मत्त झालेल्या स्वतःच्या पुत्रांना ऋषींनी दिलेला कुलक्षयाचा शापही त्याने धीरोदात्त पणे नुसता स्वीकारलाच नाही तर ऋषींच्या शब्दाचं सामर्थ्य लोप पावू नये, त्यांची शापवाणी खोटी होऊ नये म्हणून तो सर्व यादवांना प्रभासक्षेत्री घेऊन गेला. तेथे उन्मत्त झालेल्या यादवांमध्ये झालेल्या यादवीत सर्व यादवकुलाचा नाश झाल्याचा उल्लेख येतो. अशाही प्रसंगी सत्यधर्मपरायण असा कृष्ण विचलित झाला नाही. गांधारीच्या शापवाणीसाठी योग्य वेळ आली आहे हे जाणून तो समाधिस्थ बसला. कृष्णाच्या पायावर व्याधाने बाण सोडला. त्या व्याधावर क्रोधित न होता अत्यंत स्मितमुखाने त्यालाही क्षमा करून हा परमविवेकचूडामणी कृष्ण निजधामास गेला.

श्रीमद् आद्य शंकराचार्यांची प्रतिभा (श्रीकृष्णाष्टकम्) मराठीत मांडून म्हणावेसे वाटते,

शठांना संहारी, सुजन नित रक्षी सजग जो

मनी संदेहाला वितळवि, विवेका उठवितो

विसावा विश्वाचा सकल-जगजेठी निरुपमा

दिसो माझ्या नेत्री अविरत सखा कृष्ण हरि हा ।।

- अरुंधतीप्रवीणदीक्षित-

## नवरात्रीच्या गरब्यात मुस्लिमांना प्रवेशबंदी- विश्व हिंदू परिषदेची नियमावली जाहीर

### हिंदूंना प्रवेशासाठी टिळा बंधनकारक करण्याच्या सूचना

**मुंबई :** महाराष्ट्रात नवरात्री उत्सवादरम्यान आयोजित करण्यात येणाऱ्या गरबा आणि दांडिया कार्यक्रमांमध्ये बिगर-हिंदू व्यक्तींना, विशेषतः मुस्लिमांना प्रवेशबंदी करण्याचा निर्णय विश्व हिंदू परिषदेने घेतला आहे. नवरात्रीच्या पार्श्वभूमीवर आयोजकांसाठी नियमावली जाहीर करताना परिषदेने हा पवित्रा घेतला असून, उपस्थितांची ओळख पटवण्यासाठी व हिंदू संस्कृतीचे पावित्र्य टिकवण्यासाठी कपाळावर टिळा लावणे बंधनकारक करण्याचे आवाहनही करण्यात आले आहे. विश्व हिंदू परिषदेचे राष्ट्रीय प्रवक्ते आणि सहसचिव श्रीराज नायर यांनी याविषयी माध्यमांशी बोलताना सांगितले की, नवरात्री हा सण नाच-गाण्यापुरता मर्यादीत नसून, ती देवीची उपासना आहे. मूर्तीपूजेच्या विरोधात असलेल्या मुस्लिमांनी अशा धार्मिक व सांस्कृतिक महोत्सवांमध्ये का सहभागी व्हावे? हा उत्सव हिंदूंच्या सांस्कृतिक वारशाचा अविभाज्य भाग असल्याने त्याचे महत्त्व कमी होऊ दिले जाणार नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले.

या नियमावलीनुसार, नवरात्री उत्सवात सहभागी होणाऱ्या नागरिकांची ओळख पटवण्यासाठी प्रवेशद्वारावर सुरक्षा व पडताळणी मोहीम राबवली जावी, अशी सूचना करण्यात आली आहे. यात हिंदू उपस्थितांसाठी ओळख पटवून देण्याकरिता कपाळावर टिळा लावणे किंवा तत्सम नियम पाळण्याचे आवाहन आयोजकांना करण्यात आले आहे. हा निर्णय कोणत्याही विशिष्ट समुदायाविरोधातील रोषातून नव्हे, तर सांस्कृतिक पावित्र्य आणि सुरक्षेच्या खबरदारीचा उपाय म्हणून घेतला असल्याचे विश्व हिंदू परिषदेकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

## महाराष्ट्र राज्य उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ स्पर्धेसाठी अर्ज करण्यास मुदतवाढ

**मुंबई :** राज्य शासनाच्या वतीने सन २०२५ पासून महाराष्ट्रातील गणेशोत्सव हा 'महाराष्ट्राचा राज्य उत्सव' म्हणून साजरा करण्यात येत आहे. या राज्य उत्सवांतर्गत आयोजित करण्यात आलेल्या 'महाराष्ट्र राज्य उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ स्पर्धा २०२६' साठी अर्ज सादर करण्याच्या मुदतीत वाढ करण्यात आल्याची घोषणा सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. आशिष शेलार यांनी केली आहे.

यावर्षीपासून देशभरातील आणि देशाबाहेरील सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांसाठीही स्वतंत्र बक्षिसे ठेवण्यात आली असून जास्तीत जास्त गणेशोत्सव मंडळांना या स्पर्धेत सहभागी होता यावे, या उद्देशाने अर्ज सादर करण्याची अंतिम तारीख शुक्रवार, ११ सप्टेंबर २०२६ पर्यंत वाढविण्यात आली आहे.

**या स्पर्धेसाठीचे अर्ज https:**//ganeshotsav.pldmka.co.in या संकेतस्थळावर ऑनलाईन पद्धतीने स्वीकारले जात आहेत. सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांनी या सुवर्णसंधीचा लाभ घेत मोठ्या संख्येने सहभागी व्हावे आणि तालुका, जिल्हा, राज्य, राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावरील पारितोषिके पटकावावीत, असे आवाहन सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. शेलार यांनी केले आहे.

# वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठात शिक्षक दिन उत्साहात साजरा

## शिक्षकांनी विद्यार्थ्यांना 'परभणी ब्रँड' म्हणून घडविण्यासाठी योगदान द्यावे – कुलगुरू प्रा. (डॉ.) इन्द्र मणि

हिंदु प्रकाश वार्ता /प्रतिनिधी



**प्रतिनिधी** :-विद्यार्थ्यांच्या जीवनाला योग्य दिशा देत त्यांच्या ज्ञान, कौशल्य आणि व्यक्तिमत्त्व विकासामध्ये शिक्षकांची भूमिका अत्यंत महत्त्वपूर्ण असते. शिक्षक हे केवळ ज्ञानदानाचे कार्य न करता विद्यार्थ्यांमध्ये मूल्ये, आत्मविश्वास, सर्जनशीलता आणि जबाबदारीची भावना रुजविण्याचे महत्त्वपूर्ण कार्य करतात, असे प्रतिपादन माननीय कुलगुरू प्रा. (डॉ.) इन्द्र मणि यांनी केले.

डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जयंतीनिमित्त शिक्षक दिनाचे औचित्य साधून दिनांक ५ सप्टेंबर २०२६ रोजी वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठाच्या शिक्षण संचालनालयाच्या वतीने आयोजित शिक्षक दिन कार्यक्रमात ते अध्यक्षस्थानावरून बोलत होते.

यावेळी व्यासपीठावर शिक्षण संचालक डॉ. बाबासाहेब ठोंबरे संशोधन संचालक डॉ. भगवान आसेवार आणि विस्तार शिक्षण संचालक डॉ. राकेश आहिरे उपस्थित होते.

कार्यक्रमास अधिष्ठाता डॉ. प्रवीण वैद्य, डॉ. राजेश क्षीरसागर, डॉ. विश्वनाथ खंदारे, डॉ. राजेश कदम, डॉ. रावसाहेब भाग्यवंत, विविध महाविद्यालयांचे अधिष्ठाता, विभागप्रमुख, प्राध्यापक, शिक्षक तसेच मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या प्रारंभी विद्यार्थ्यांनी उपस्थित सर्व गुरुजनांना गुलाबपुष्प देऊन आदर व कृतज्ञता व्यक्त केली. यावेळी विद्यापीठातील सर्व शिक्षकवृंदांना शिक्षक दिनाच्या हार्दिक शुभेच्छा देण्यात आल्या.

मार्गदर्शन करताना कुलगुरू प्रा. (डॉ.) इन्द्र मणि म्हणाले की, शिक्षकांची भूमिका अत्यंत व्यापक आहे. 'टीचर', 'लेक्चरर' आणि 'प्रोफेसर' ही शिक्षकांची विविध रूपे असली तरी त्या सर्वांचे मूलभूत कार्य ज्ञानदान आणि व्यक्तिमत्त्व विकास हेच आहे. डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन हे एक महान तत्त्वज्ञ आणि प्राध्यापक होते. त्यांच्या जन्मदिनाचे शिक्षक दिन म्हणून स्मरण केले जाते, ही शिक्षक व्यवसायाच्या गौरवाची बाब आहे.

शिक्षण हे केवळ पुस्तके व पदव्यांपुरते मर्यादित नसते. जीवनातील विविध घटना, परिस्थिती, अनुभव आणि व्यक्ती यांच्याकडूनही माणूस सातत्याने शिकत असतो. शिक्षक ही केवळ एखादी व्यक्ती नसून एखादे बालक, घटना, परिस्थिती अथवा जीवनातील अनुभवदेखील शिक्षकाची भूमिका बजावू शकतात, असे त्यांनी सांगितले. भारताच्या परंपरेत औपचारिक शिक्षण न घेतलेले अनेक संत आणि गुरु होऊन गेले असून, कबीरदास यांचे उदाहरण यासाठी देता येईल, असेही त्यांनी नमूद केले.

शिक्षणातून ज्ञान प्राप्त होते, ज्ञानातून विनम्रता येते आणि विनम्रतेतून पात्रता निर्माण होते. पात्रतेच्या बळावर यश, समृद्धी आणि उत्तम कर्म साध्य करता येते व त्यातून जीवनात समाधान प्राप्त होते, असे माननीय कुलगुरूंनी सांगितले.

प्रत्येक व्यक्तीमध्ये सतत शिकण्याची आणि पुढे जाण्याची भूक असणे आवश्यक आहे. ज्या दिवशी एखाद्या व्यक्तीला 'मला सर्व काही येते' असे वाटते, त्या दिवसापासून त्याची प्रगती थांबते. धन म्हणजे केवळ पैसा नसून यश, गौरव आणि पद यांचाही त्यामध्ये समावेश होतो. मात्र, पद आणि प्रतिष्ठेमुळे स्वभावात बदल होऊ न देता त्याचा उपयोग लोकहितासाठी केला पाहिजे. आपल्यापेक्षा पद मोठे समजू नये, असे आवाहन त्यांनी केले.

शिक्षक कसा राहतो, कसा बोलतो आणि कसा वागतो, याचे अनुकरण विद्यार्थी करीत असतात. त्यामुळे शिक्षकांनी स्वतःच्या आचरणातून उच्च आदर्श निर्माण करणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांनी शिस्तीचे पालन करून चारित्र्यवान बनावे आणि 'परभणी ब्रँड' म्हणून स्वतःची वेगळी ओळख निर्माण करावी, यासाठी प्रत्येक शिक्षकाने योगदान द्यावे, असे माननीय कुलगुरूंनी सांगितले.

प्रत्येक व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वामध्ये बाल्य, शिक्षकत्व आणि पालकत्व असे तीन गुण आढळून येतात. बाल्यगुणामध्ये हट्टाची प्रवृत्ती असते, शिक्षकत्वामध्ये चुका शोधून त्यात सुधारणा करण्याची वृत्ती असते, तर पालकत्वामध्ये सतत मार्गदर्शन व काळजी करण्याचा गुण असतो. या सर्व गुणांमध्ये योग्य संतुलन राखल्यास व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास होतो आणि यशस्वी जीवन जगता येते, असे त्यांनी स्पष्ट केले.

दुसऱ्याच्या दुःखात आनंद न मानता दुसऱ्याच्या दुःखात दुःखी आणि सुखात आनंदी होण्याची वृत्ती जोपासणे, हीच खरी शिक्षणाची शिकवण आहे. मनात द्वेष न ठेवता सद्भावना आणि सांघिक वृत्तीने कार्य करावे, असेही त्यांनी सांगितले.

विद्यापीठातील विद्यार्थ्यांपुरतीच शिक्षकांची जबाबदारी मर्यादित नसून, शेतकरीदेखील आपले विद्यार्थी आहेत, या भावनेतून कृषि ज्ञान आणि तंत्रज्ञान शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्याचे कार्य सर्वांनी करावे, असे आवाहन माननीय कुलगुरूंनी केले.

शिक्षण संचालक डॉ. बाबासाहेब ठोंबरे यांनी शिक्षक दिन हा शिक्षकांचा सन्मान आणि गौरव करण्याचा दिवस असल्याचे सांगितले. विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची सुरुवात घरातून आई-वडिलांकडून होते. शालेय शिक्षण शिक्षकांकडून मिळते; मात्र जीवन कसे जगावे, याचे मार्गदर्शनही शिक्षकच करतात. ज्ञान महत्त्वाचे असले तरी त्याचा योग्य उपयोग करण्याचे शहाणपण त्याहून अधिक महत्त्वाचे आहे, असे त्यांनी नमूद केले.

संशोधन संचालक डॉ. भगवान आसेवार यांनी शिक्षक हा उत्साही, प्रेरणादायी आणि विद्यार्थ्यांना योग्य दिशा देणारा असावा, असे सांगितले. कृषि क्षेत्रासमोर अनेक आव्हाने उभी असून, ती सोडविण्यासाठी गुरुजनांकडून मिळालेले ज्ञान आणि तंत्रज्ञान कृषि विद्यार्थ्यांनी शेतकरी आणि समाजापर्यंत पोहोचवावे, असे आवाहन त्यांनी केले. नवीन शैक्षणिक धोरणानुसार विद्यापीठामध्ये कौशल्याधारित आणि विद्यार्थी-केंद्रित शिक्षण पद्धतीचा अवलंब करण्यात येत आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी केवळ नोकरी मागणारे न बनता रोजगारनिर्मिती करणारे बनावे, असे त्यांनी सांगितले. शिक्षकांनी आपल्या व्यवसायाशी पूर्ण समर्पण ठेवून विद्यार्थ्यांना योग्य मार्गदर्शन करावे आणि सतत नावीन्याशी जोडलेले राहावे, असेही त्यांनी नमूद केले. विद्यार्थ्यांचे यश हीच शिक्षकांना मिळणारी सर्वांत मोठी पावती असल्याचे त्यांनी सांगितले.

विस्तार शिक्षण संचालक डॉ. राकेश आहिरे यांनी शिक्षकांप्रती आदरभाव व्यक्त करण्याचे महत्त्व विशद केले. व्यक्तीची जडणघडण आई-वडिलांपासून सुरू होते आणि पुढील औपचारिक शिक्षण व व्यक्तिमत्त्व विकासामध्ये शिक्षकांचे महत्त्वपूर्ण योगदान असते. केवळ शिक्षकच नव्हे, तर पालक, वरिष्ठ आणि जीवनात मार्गदर्शन करणारी प्रत्येक व्यक्ती ही आपली गुरु असते. त्यामुळे सर्वांप्रती आदरभाव ठेवावा, असे त्यांनी सांगितले.

अधिष्ठाता डॉ. प्रवीण वैद्य यांनी शिक्षक दिनाच्या महत्त्वावर मार्गदर्शन करताना माननीय कुलगुरू प्रा. (डॉ.) इन्द्र मणि यांच्या सान्निध्यातून मिळालेल्या ज्ञानाचा आणि मार्गदर्शनाचा उल्लेख केला.

डॉ. प्रवीण कापसे यांनी आदर्श शिक्षकाची संकल्पना स्पष्ट करताना माननीय कुलगुरू प्रा. (डॉ.) इन्द्र मणि यांच्या नेतृत्वाखाली आणि मार्गदर्शनाखाली मागील चार वर्षांत विद्यापीठाने केलेल्या प्रगतीचा आणि विविध क्षेत्रांतील यशाचा आढावा घेतला. माननीय कुलगुरू हे राष्ट्रीय पातळीवरील उच्च दर्जाचे मार्गदर्शक असून त्यांच्या कार्याची विविध स्तरांवर दखल घेण्यात आल्याचे त्यांनी नमूद केले.

माननीय कुलगुरू यांचे विद्यार्थी तथा कृषि अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालयातील डॉ. विशाल इंगळे यांनी माननीय कुलगुरूंकडून मिळालेल्या ज्ञानाबद्दल कृतज्ञता व्यक्त करून आपल्या भावना व्यक्त केल्या.

माननीय कुलगुरू यांचे स्वीय सचिव श्री. बालाजी डोईजड यांनी गुरुजनांप्रती आदर व्यक्त करणारे गीत सादर केले. विद्यार्थिनी शुभांगी शुक्ला यांनी प्रसिद्ध गायक मन्ना डे यांच्या 'तू प्यार का सागर है' या गीताच्या सादरीकरणातून गुरुजनांप्रती आदरभाव व्यक्त केला. विद्यार्थी शुभम कुमार, शिवम राज आणि वैष्णवी बांगर यांनीही आपल्या मनोगतातून शिक्षकांप्रती कृतज्ञता व्यक्त केली.

कार्यक्रमाचे आयोजन शिक्षण संचालक डॉ. बाबासाहेब ठोंबरे यांच्या मार्गदर्शनाखाली अधिष्ठाता डॉ. प्रवीण वैद्य आणि विभागप्रमुख डॉ. सचिन मोरे यांनी केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन कृषि महाविद्यालयाच्या चौथ्या वर्षात शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थिनी आराध्या सिंग आणि शुभांगी शुक्ला यांनी केले.

विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शिक्षकांनी दिलेले मार्गदर्शन, ज्ञान आणि प्रेरणा ही समाजाच्या प्रगतीची भक्कम पायाभरणी असल्याचे यानिमित्ताने अधोरेखित करण्यात आले. कृषि शिक्षण, संशोधन आणि विस्तार शिक्षणाच्या माध्यमातून सक्षम, संवेदनशील आणि ज्ञानसमृद्ध विद्यार्थी घडविणाऱ्या विद्यापीठातील सर्व शिक्षकांना यावेळी शिक्षक दिनाच्या मनःपूर्वक शुभेच्छा देण्यात आल्या.

दैनिक हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No.: MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी



# राजकुंवर महाविद्यालयात गोपालकाला उत्सव साजरा



**फर्दापूर :** राजकुंवर महाविद्यालयात गोपालकाला उत्सवानिमित्त विविध कार्यक्रमांचे उत्साहात आयोजन करण्यात आले. मुख्याध्यापिका एम.पी. सपकाळे यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या कार्यक्रमामुळे महाविद्यालय परिसरात उत्साह आणि आनंदाचे वातावरण निर्माण झाले. कार्यक्रमाला महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. ए. जे. बेडवाळ यांची प्रमुख उपस्थिती लाभली. यावेळी महाविद्यालयातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झाले. गोपालकाला उत्सवाच्या निमित्ताने आयोजित विविध उपक्रमांमध्ये विद्यार्थी व कर्मचाऱ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. सर्वांच्या सहभागामुळे कार्यक्रमाची रंगत वाढली आणि महाविद्यालय परिसरात उत्सवी वातावरण निर्माण झाले.

# खुलताबाद पंचायत समितीच्या प्रभारी सभापती मंदाताई वाकळे

दैनिक हिंदू प्रकाश वार्ता



खुलताबाद प्रतिनिधी .खुलताबाद पंचायत समितीच्या भारतीय जनता पार्टीच्या सभापती सुनिता खंडागळे या दोन महिन्याच्या सुट्टीवर गेल्याने १७ ऑगस्ट ते १८ ऑक्टोबर पर्यंत शिव सेना ( उद्धव ठाकरे गटाच्या) उपसभापती मंदाताई बद्रीनाथ वाकळे यांच्याकडे प्रभारी सभापती म्हणून विराजमान झाल्या आहेत. भडजी येथील शेतकरी कुटुंबातील असून कुठलाही राजकीय वारसा नसताना शिवसेनाप्रमुखांचे विचार शिवसेनेवरील निष्ठा या जोरावर खुलताबाद पंचायत समितीतील एकमेव सदस्य म्हणून निवडून आल्या. छत्रपती संभाजी नगर शिवसेनेचे जिल्हाप्रमुख आ. अंबादास दानवे, यांच्या मार्गदर्शनाखाली भारतीय जनता पार्टीची युती करून उपसभापती पद . व परत प्रभारी सभापती मिळाल्याने आपण तालुक्यातील पंचायत समिती अंतर्गत राबवल्या जाणाऱ्या प्रत्येक योजना प्रभावीपणे राबवण्याचा प्रयत्न करणार असल्याची माहिती दिली आ. प्रशांत बंब, तालुकाप्रमुख राजू वरकड यांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या

# परभणी शहरात पु.ना.गाडगीळ आणि संन्स नवीन जागेत दालनाचा शुभारंभ



हिंदू प्रकाश वार्ता प्रतिनिधी

**परभणी:-** परभणी करांच्या सेवेत व प्रत्येकाच्या मनामनामध्ये घराघरांमध्ये गेली आठ वर्षापासून विश्वास पात्र स्थान निर्माण करून पु ना गाडगिळ आणि सन्सने आपल्या भव्य दिव्य विद्यमान दागिन्याच्या दालनाचे अधिक सोयीस्कर आणि आकर्षक ठिकाणी स्थलांतर केले आहे शहराच्या मध्यभागी असलेले छत्रपती शिवाजी महाराज पुतळा जवळील नव्या ठिकाणी नव्या ठिकाणी पु. ना. गाडगीळ आणि संन्स च्या नवनिर्मित जागेत भव्य दालनाचा शुभारंभ मान्यवराच्या उपस्थितीत उत्साह पूर्ण वातावरणात संपन्न झाला

या शुभप्रसंगी कुलगुरू डॉ इंद्रा मणी डॉ. शरद वाघ डॉ. मंजुषा वाघ व परिवार पु ना. गाडगीळ आणी सन्स चे प्रमोटर संचालक अजित गाडगीळ तसेच सतीश कुबेर जितेंद्र जोशी चंद्रकांत करवार आणि शेख हँड फाउंडेशन चे शरद लोहट यांच्या सह विविध परभणीमध्ये गेल्या आठ वर्षापासून परभणी करांच्या पसंतीला उतरलेले व ग्राहकांना दर्जेदार दागिन्यांचा व विश्वास हर्ता सेवा आणि पारदर्शक व्यवहाराचा अनुभव देणाऱ्या पु ना गाडगीळ आणि सन्सने ग्राहकाच्या वाढत्या अपेक्षा लक्षात घेऊन आपल्या भव्य दालनात नव्या ठिकाणी स्थलांतर केले या भव्यदालनातून ग्राहकांना अधिकारामदायी वातावरणात सोने हिरे आणि विविध प्रकारच्या दागिन्यांचे विविध पूर्ण कलेक्शन अनुभवता येणार आहे यावेळी बोलताना पुना गाडगीळ आणि संन्स चे प्रमोटर संचालक अजित गाडगीळ म्हणाले की परभणीकरांनी गेल्या आठ वर्षात पु. ना.गाडगीळ आणि संन्स वर जो विश्वास आणि प्रेम दाखवले आहे ते आमच्यासाठी अत्यंत मोलाचे आहे या विश्वासाला अधिक चांगल्या प्रकारे अनुभवाची जोड देण्यासाठी आम्ही आमचे भव्य दालन नव्या ठिकाणी स्थलांतरित केले आहे परभणी आणि परिसरातील ग्राहकांना प्रत्येक आनंदाच्या क्षणाचा विश्वासू साथीदार होणे हेच आमचे ध्येय आहे परभणीकरांच्या आठ वर्षाच्या विश्वासाला शेल्यूट करत आपल्या भव्यदिव्य नव्या जालनातून पुन्हा गाडगीळ आणि सन्स आपल्या सेवेला आणि ग्राहकाच्या नात्याला नव्याने झळाळी देत नवी सुरुवात केली आहे यामुळे शुभारंभ निमित्त ग्राहकांना दर्जेदार दागिन्यासोबतच आकर्षक ऑफर घेण्याचाही लाभ व विशेष संधी उपलब्ध करून दिली आहे.

# वाळूज महानगर-२ भागांत 'बस थांबा' ची मागणी

**छत्रपती संभाजीनगर/ प्रतिनिधी :** वाळूज महानगर-२, सिडको, साऊथ सिटी, म्हाडा कॉलनी, श्रद्धा कॉलनी, गोलवाडी या भागांतून मोठ्या प्रमाणात विद्यार्थी शाळा, महाविद्यालय, कोचिंग क्लासेससाठी ये-जा करतात. एकूणच या भागांतील रस्त्यांवर वाहतुकीची मोठी वर्दळ असते. मेन रोडवर बस थांबा नसल्याने पावसाळ्याच्या दिवसांत विद्यार्थ्यांची मोठी गैरसोय होत आहे. यासाठी वाळूज महानगर-२, सिडको, साऊथ सिटी गेट येथे बस थांबा करणे अत्यंत गरजेचे आहे. महाप्रशासनाने त्वरित नगर नाक्याकडून येणाऱ्या व एएस क्लबकडून जाणाऱ्या रस्त्यांवर दोन्ही बाजूस बस थांबा करावा, अशी आग्रही मागणी वाळूज महानगर भागातील नागरिकांनी महापौर समीर राजूरकर यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. निवेदनाच्या प्रती वाळूज पोलीस, डॉ. बामुचे कुलगुरू, एसटी महामंडळाचे विभागीय नियंत्रक, तिसगांव ग्राम पंचायतचे सरपंच आदींना देण्यात आल्या असल्याचे डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या विद्या परिषदेचे सदस्य डॉ. विकास कापरे आणि मित्रमंडळाने माध्यम प्रतिनिधींना सांगितले.

# सेलू येथील सार्वजनिक बांधकाम उपविभागाची नूतन इमारत व शासकीय निवासस्थान इमारतीचे लोकार्पण संपन्न

## सेलू शहराच्या सर्वांगीण, आधुनिक विकासाला प्राधान्य : पालकमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर

हिंदु प्रकाश वार्ता /प्रतिनिधी



**परभणी :** सेलू शहराच्या सर्वांगीण विकासासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले जातील. शहर स्वच्छ, सुंदर, आधुनिक आणि नागरिकांसाठी अधिक सुविधायुक्त बनविण्यावर विशेष भर दिला जाईल, अशी ग्वाही पालकमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांनी दिली.

सेलू येथील सार्वजनिक बांधकाम उपविभागाची नूतन इमारत व शासकीय निवासस्थान इमारतीचा लोकार्पण सोहळा आज पालकमंत्री यांच्या हस्ते संपन्न झाला. त्यावेळी आयोजित कार्यक्रमात त्या बोलत होत्या. याप्रसंगी नगराध्यक्ष मिलिंद सावंत, उपविभागीय अधिकारी शैलेश लाहोटी, तहसीलदार डॉ. शिवाजी मगर, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता धनंजय जाधव यांच्यासह पदाधिकारी व नागरिक उपस्थित होते.

पालकमंत्री श्रीमती बोर्डीकर म्हणाल्या की, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली देश वेगाने विकासाच्या दिशेने वाटचाल करत आहे. प्रत्येक क्षेत्रात जागतिक दर्जाच्या सुविधा निर्माण केल्या जात आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्रातही विकासाला नवी गती मिळाली असून दळणवळण, आरोग्य, शिक्षण आणि सार्वजनिक सुविधांची कामे उच्च दर्जाची झाली पाहिजेत, असा त्यांचा मानस आहे. याच विकासाच्या धर्तीवर सेलू शहराचाही सर्वांगीण आणि आधुनिक विकास करण्यासाठी प्रयत्न केले जातील.

# सभापती अनिल मकरीये यांना विविध मागण्यांचे निवेदन

## जय जय रघुवीर समर्थ सेवाभावी संस्थेच्या पदाधिकाऱ्यांची भेट; सर्वोतोपरी मदतीचे आश्वासन

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी



**छत्रपती संभाजीनगर :** जय जय रघुवीर समर्थ सेवाभावी संस्था महाराष्ट्राच्या वतीने महानगरपालिकेचे सभापती अनिल मकरीये यांना विविध मागण्यांचे निवेदन देण्यात आले. यावेळी संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी मकरीये यांच्याशी विविध सामाजिक व संस्थात्मक उपक्रमांबाबत चर्चा केली.

यावेळी सभापती अनिल मकरीये यांचा समर्थ रामदास स्वामी यांचा दासबोध ग्रंथ, शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. संस्थेचे अध्यक्ष सुहास ठोसर यांनी संस्थेच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या सामाजिक, धार्मिक, आध्यात्मिक तसेच विविध सेवाभावी उपक्रमांची माहिती मकरीये यांना दिली.

संस्थेच्या विविध उपक्रमांसाठी आवश्यक असलेल्या साहित्य व इतर सुविधांबाबत मागण्यांचे निवेदन यावेळी सादर करण्यात आले. या मागण्यांवर सभापती अनिल मकरीये यांच्यासोबत सविस्तर चर्चा करण्यात आली. संस्थेच्या सामाजिक व सेवाभावी कार्याला सहकार्य करण्याची भूमिका मकरीये यांनी व्यक्त केली.

संस्थेच्या विविध उपक्रमांसाठी आवश्यक त्या बाबींमध्ये आपण सर्वोतोपरी मदत करू, असे आश्वासन सभापती अनिल मकरीये यांनी उपस्थित पदाधिकाऱ्यांना दिले.

यावेळी संस्थेचे सचिव लक्ष्मीकांत राजूरकर, कोषाध्यक्ष विवेक कंगळे, संपर्कप्रमुख पंकज तांबोळी, प्रसिद्धी व जनसंपर्कप्रमुख धनंजय ब्रह्मपूरकर, तज्ज्ञ सल्लागार त्र्यंबकेश्वर मुंडे, मार्गदर्शक सुरेश काळेकर, श्रीकांत खोत, संघटक प्रवीण महाजन, संतोष संत्रे, गोविंद गालफाडे, खंडेराव भारुड, दत्ता भोसले, गजानन देशमुख, नितीन जोशी, नरेंद्र खोचे, विश्वंभर कुलकर्णी यांच्यासह संस्थेचे पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते.

# संत तुकाराम प्राथमिक विद्यालय व तुकाराम सोनवणे हायस्कूलमध्ये शिक्षक दिन संपन्न

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी



छत्रपती संभाजीनगर

ज्ञानाचे दीप तेजाळणाऱ्या आणि विद्यार्थ्यांच्या भविष्याला आकार देणाऱ्या शिक्षकांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी ५ सप्टेंबर रोजी सिडको एन-७ येथील ज्ञानसंदीप शिक्षण संस्था संचलित संत तुकाराम प्राथमिक विद्यालय व तुकाराम सोनवणे हायस्कूलमध्ये 'शिक्षक दिन' अत्यंत उत्साहात साजरा करण्यात आला. डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जन्मदिनानिमित्त आयोजित या विशेष कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी संपूर्ण शाळेचा कारभार स्वतः सांभाळून अनोख्या पद्धतीने हा दिन साजरा केला.

कार्यक्रमाची सुरुवात डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेसह क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले, महात्मा ज्योतिबा फुले आणि महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून व दीप प्रज्वलन करून करण्यात आली. याप्रसंगी आयोजित कार्यक्रमात संस्थेचे संस्थापक अध्यक्ष प्रा. प्रकाश सोनवणे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना शिक्षक आणि विद्यार्थ्यांच्या नात्याचे महत्त्व अधोरेखित केले. या विशेष दिनी शिक्षक बनलेल्या विद्यार्थी-विद्यार्थ्यांचा शाळेच्या वतीने गुलाब पुष्प, छोटेसे रोपटे आणि डाबर चमनप्रास भेट देऊन गौरव करण्यात आला. तसेच विद्यार्थ्यांनीही आपल्या शिक्षकांना पेन व भेटवस्तू देऊन आदरांजली व अभिवादन केले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मुख्याध्यापक संदीप सोनवणे, हर्षल पगारे, सुनील चौधरी, किरणकुमार सोनवणे, शीतल घुगे आणि साहेबराव शिंदे यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ज्ञानसंदीप प्राथमिक व माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक अभिजित सोनवणे यांनी केले, तर आभार प्रदर्शन विजय पाटील यांनी मानले.

# संत ज्ञानेश्वर महाविद्यालयात शिक्षक दिनानिमित्त 'स्वयंशासित दिन' उत्साहात साजरा

हिंदू प्रकाशवार्ता/प्रतिनिधी

सोयगाव,दि.५ सप्टेंबर

अजिंठा शिक्षण संस्था संचलित संत ज्ञानेश्वर महाविद्यालय, सोयगाव येथे शिक्षक दिनानिमित्त 'स्वयंशासित दिन' उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला.या उपक्रमाला विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत एक दिवसाची शैक्षणिक जबाबदारी स्वतःच्या खांद्यावर घेतली.

'स्वयंशासित दिना'च्या निमित्ताने विद्यार्थ्यांनी प्राध्यापकांची भूमिका स्वीकारत विविध वर्गांमध्ये अध्यापन केले. विद्यार्थ्यांनी विषयांची तयारी करून आत्मविश्वासाने वर्गावर शिकवणी घेतली. या उपक्रमातून विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्वगुण, वक्तृत्वकौशल्य, अध्यापन कौशल्य तसेच जबाबदारीची भावना विकसित होण्यास मदत झाली.

कार्यक्रमाच्या समारोप प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य अध्यक्षस्थानी होते. प्रमुख उपस्थिती म्हणून तेजस्विनीताई रोहित काळे उपस्थित होत्या. तसेच मंचावर कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य उल्हास पाटील उपस्थित होते. त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना शिक्षक दिनाचे महत्त्व स्पष्ट केले. विद्यार्थ्यांनी शिक्षकांची भूमिका स्वीकारून घेतलेला अनुभव त्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी निश्चितच उपयुक्त असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी तेजस्विनीताई रोहित काळे यांनी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व शिक्षकांना शिक्षक दिनाच्या हार्दिक शुभेच्छा दिल्या. शिक्षक हे विद्यार्थ्यांच्या जीवनाला योग्य दिशा देणारे मार्गदर्शक असून त्यांच्या कार्याचा सन्मान करणे ही प्रत्येकाची जबाबदारी असल्याचे त्यांनी नमूद केले.

समारोप कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीकृष्ण परिहार यांनी केले, तर आभार प्रदर्शन डॉ. रामेश्वर मगर यांनी मांडले.

या उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. सुनील चौधरे, डॉ. दीपक पारदे, डॉ. शिवाजी शिरसाट, प्रा. सुभाष पाटील, प्रा. रवींद्र जाधव, प्रा. तोफिक शेख, प्रा. अनिल मानकर, प्रा. स्वाती देशमुख, प्रा. भारती पाटील, व प्रा . अश्विनी काळे यांनी परिश्रम घेतले.

विद्यार्थ्यांनी दिवसभर शिक्षकांची भूमिका अत्यंत उत्साहाने व जबाबदारीने पार पाडल्याने 'स्वयंशासित दिन' हा उपक्रम संस्मरणीय ठरला. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना अध्यापनाचा प्रत्यक्ष अनुभव मिळाला तसेच शिक्षकांच्या कार्याचे महत्त्वही जाणवले.

# डॉ. रमेश काळे आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मानित



सिल्लोड येथे ५ सप्टेंबर रोजी पार पडलेल्या कार्यक्रमात शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय आणि नाविन्यपूर्ण कामगिरी केल्याबद्दल श्री छत्रपती शिवाजी विद्यालयातील शिक्षक डॉ. रमेश काळे यांना अजिंठा एज्युकेशन अँड मिलिटरी प्रेपरेटरी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष उत्तमसिंग पवार, सचिव अशोक देवरे, प्राचार्य डॉ. गुरुदत्त राजपूत यांच्या संकल्पनेतून इंद्रराज कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय सिल्लोड यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या शिक्षक सन्मान सोहळा निमित्त तालुकास्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार २०२६ प्रदान करण्यात आले.

सिल्लोड येथील एमटीडीसी सभागृहात आयोजित सोहळ्यात मान्यवरांच्या हस्ते डॉ. रमेश काळे यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. शाल, श्रीफळ, सन्मानचिन्ह आणि गौरवपत्र असे या पुरस्काराचे स्वरूप होते.

डॉ. रमेश काळे यांनी गेल्या १५ वर्षांहून अधिक काळ शिक्षण क्षेत्रात अविरत कार्य करत केवळ पुस्तकी ज्ञान न देता विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास कसा साधता येईल, यावर त्यांनी भर दिला. ग्रामीण आणि दुर्गम भागातील विद्यार्थ्यांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी त्यांनी केलेले प्रयत्न कौतुकास्पद ठरले आहेत. त्यांनी अध्यापनात आधुनिक तंत्रज्ञानाचा आणि डिजिटल साधनांचा प्रभावी वापर करून शिक्षण अधिक रंजक आणि सोपे केले. त्यांनी सुरू केलेल्या विशेष शैक्षणिक उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांची उपस्थिती वाढली व विद्यार्थ्यांचा शैक्षणिक दर्जा सुधारण्यास मोठी मदत झाली. त्यांच्या या कामगिरीची दखल घेऊन त्यांची या पुरस्कारासाठी निवड करण्यात आली होती.

पुरस्कार स्वीकारल्यानंतर डॉ. रमेश काळे म्हणाले, हा पुरस्कार म्हणजे माझ्या शिक्षण क्षेत्रातील प्रामाणिक प्रयत्नांची पोचपावती आहे. तसेच हा सन्मान माझा एकट्याचा नसून, मला साथ देणारे माझे सहकारी शिक्षक, संस्था आणि माझ्या विद्यार्थ्यांचा आहे. या पुरस्कारामुळे माझी जबाबदारी अधिक वाढली असून, भविष्यात विद्यार्थ्यांसाठी आणखी जोमाने काम करण्याची प्रेरणा मिळाली आहे. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. अनिरुद्ध मोरे यांनी केले तर आभार डॉ. संतोष चौथाईवाले यांनी मानले. हा पुरस्कार मिळाल्याबद्दल राजश्री शाहू शिक्षण संस्थेचे अध्यक्ष प्रभाकर पालोदकर, सचिव डॉ. राहुल पालोदकर, प्राचार्य डॉ. अशोक पंडित, मुख्याध्यापक निशांत म्हस्के यांच्याकडून त्यांचे अभिनंदन करण्यात आले.

# श्री राधा कृष्णा मंदिरात कृष्ण जन्मोत्सव उत्साहात साजरा



**जिंतूर, प्रतिनिधी :** शहरातील राधा श्रीकृष्ण मंदिर येथे श्रीकृष्ण जन्माष्टमी निमित्त आयोजित करण्यात आलेला कृष्ण जन्मोत्सव मोठ्या भक्तिभावाने आणि उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. मंदिर परिसरात दिवसभर धार्मिक कार्यक्रमांची रेलचेल असून मध्यरात्री श्रीकृष्ण जन्मोत्सवाच्या वेळी भाविकांनी जयघोष करत भक्तीचा उत्सव अनुभवला.

यावेळी महिला, पुरुष, ज्येष्ठ नागरिक तसेच बालगोपालांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमात सहभाग नोंदविला. मंदिरात भजन, कीर्तन, अभंग गायन आणि नामस्मरणाच्या माध्यमातून श्रीकृष्णाच्या भक्तीचा जागर करण्यात आला. भक्तांनी टाळ-मृदंगाच्या गजरात अभंग म्हणत परिसर भक्तिरसाने भारावून टाकला.

मध्यरात्री श्रीकृष्ण जन्माचा सोहळा पार पडताच उपस्थित भाविकांनी "जय श्रीकृष्ण", "गोविंदा गोपाळा" अशा जयघोषांनी मंदिर परिसर दुमदुमून सोडला. श्रीकृष्णाच्या पाळण्याला भक्तांनी दर्शन घेऊन फुले अर्पण केली. यानंतर महाप्रसादाचेही आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी मंदिर समिती, सेवेकरी व भक्तगण यांनी विशेष परिश्रम घेतले. धार्मिक आणि सांस्कृतिक परंपरा जपत साजरा करण्यात आलेल्या या कृष्ण जन्मोत्सवामुळे जिंतूर शहरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते.

# सोयगाव शहरातील संत ज्ञानेश्वर महाविद्यालयात शिक्षक दिन साजरा



हिंदू प्रकाशवार्ता/ प्रतिनिधी

सोयगाव,दि.५ सप्टेंबर

५ सप्टेंबर रोजी संत ज्ञानेश्वर महाविद्यालयात विद्यार्थ्यांनी स्वयंअध्ययन करून विद्यार्थ्यांनी शिक्षक दिन साजरा केला या कार्यक्रमात ७० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला त्यात प्रथम प्रतिक्षा पगारे,द्वितीय सायली कराळे,तृतीय सोहम शेट्टे या विद्यार्थ्यांचा पारितोषिक देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून तेजस्विनीताई काळे या महाविद्यालयात उपस्थित होत्या तसेच महाविद्यालयातील प्राचार्य डॉ.शिरीष पवार अध्यक्षस्थानी होते. कनिष्ठ विभाग प्रमुख डॉ.उल्हास पाटील यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमासाठी उपप्राचार्य डॉ.रावसाहेब बारोटे,सुभाष पाटील,आर.टी.जाधव,ए.टी.मानकर,बी.ए.पाटील,तौफिक शेख,स्वाती देशमुख,अश्विनी काळे,योगेश काळे,कल्याणकर सर,विनोद चव्हाण,एस.के.कानडे,एस.बी.बुटुले,डी.पी.लिंबे, व महाविद्यातील शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते व मोठ्या संख्येने विद्यार्थ्यांची उपस्थिती होती.

# जि.प. प्राथमिक शाळा रामजीनगर येथे दहीहंडी उत्सव मोठ्या उत्साहात

हिंदू प्रकाशवार्ता/प्रतिनिधी

सोयगाव,दि.५ सप्टेंबर



प्राथमिक शाळा रामजीनगर येथे गोकुळाष्टमी निमित्त दहीहंडी उत्सव मोठ्या उत्साहात व आनंदात साजरा करण्यात आला.यावेळी शाळेतील विद्यार्थ्यांनी श्रीकृष्ण व राधेच्या वेशभूषेत सहभागी होत उपस्थितांची मने जिंकली.

कार्यक्रमाची सुरुवात श्रीकृष्णाच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली.विद्यार्थ्यांनी श्रीकृष्णाच्या बाललीलांवर आधारित गीते,नृत्य व सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले. त्यानंतर विद्यार्थ्यांनी दहीहंडी फोडण्याचा आनंद लुटला. परिसरात 'गोविंदा आला रे!'च्या जयघोषाने उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.

या कार्यक्रम यशस्वीतेसाठी मुख्याध्यापक,शिक्षक,यांनी आयोजन केले यावेळी व्यवस्थापन समिती अध्यक्ष,सदस्य माजी विद्यार्थी संघ अध्यक्ष सदस्य,विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. विद्यार्थ्यांना गोकुळाष्टमीचे धार्मिक व सांस्कृतिक महत्त्व समजावून सांगण्यात आले.मोठ्या उत्साहपूर्ण वातावरणात

# कै.बाबुरावजी काळे मराठी स्कूल सोयगाव येथे दहीहंडी उत्साहात साजरी

हिंदू प्रकाशवार्ता/प्रतिनिधी

सोयगाव,दि.५ सप्टेंबर

आनंददायी शनिवार या उपक्रमांतर्गत जल्लोषमय वातावरणात शाळेत गोकुळाष्टमी निमित्त दहींडी फोडून गोपाळकाला साजरा करण्यात आला.राधा व श्रीकृष्णाच्या वेशभुषेत सजलेल्या बालकांनी उपस्थितांचे मन मोहून टाकले.विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या गवळणी आणि कृष्णजन्माच्या गीतांनी कार्यक्रमाला भक्तिमय रंगत आणली. हर्षल राऊत या विद्यार्थ्यांने दहीहंडी फोडली. दहीहंडी फुटताच हाथी घोडा पालखी.....जय कन्हैया लाल की..., गोविंदा रे या जयघोषाने संपूर्ण शाळा परीसर दणाणून गेला.लहानग्या गोविंदाच्या उत्साहात संपूर्ण विद्यार्थी वर्ग सामील झाला.गोकुळाष्टमीच्या निमित्ताने शाळेच्या आवारात रांगोळ्या, फुले, फूगे याने सजावट करण्यात आली. शाळेच्या शिक्षिकांनी व माता पालकांनी श्रीकृष्ण जन्माचा पाळणा म्हणून कार्यक्रमाची सुरुवात केली.शाळेचे उपमुख्याध्यापक ज्ञानेश्वर एलिस,योगेश काळे, सागर घाटे यांनी दहीहंडीचे पूजन करून दहीहंडी फोडण्यात आली.या वेळी शाळेचे उपमुख्याध्यापक ज्ञानेश्वर एलिस यांनी दहीहंडी हे एकतेचे प्रतिक आहे,अशा सण-उत्सवातुन विविधतेने नटलेल्या एकात्म भारताचे दर्शन घडते आणि समाजातील सर्व घटकांना एकत्र आणण्याचे काम होते.

या उपक्रमांतून विद्यार्थ्यांमध्ये आपल्या संस्कृतीसह एकात्मतेची भावना वाढीस लागत असल्याचे स्पष्ट केले. हा सोहळा यशस्वी करण्यासाठी सर्व शालेय शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# 15 हजारांहून अधिक विद्यार्थ्यांनी रेखाटला रस्ता सुरक्षेचा संदेश; 23 गुणवंतांचा गौरव



हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर** : विद्यार्थ्यांच्या मनात लहान वयातच सुरक्षित वाहतूक, वाहतूक शिस्त आणि जबाबदार नागरिकत्वाची जाणीव निर्माण करण्याच्या उद्देशाने छत्रपती संभाजीनगर ग्रामीण पोलिसांच्या वतीने राबविण्यात येत असलेल्या 'रस्ता सुरक्षा अभियानांतर्गत' जिल्हास्तरीय चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत जिल्ह्यातील २३ पोलीस ठाण्यांच्या हद्दीतील शाळांमधील तब्बल १५ हजार १२३ विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

शिक्षक दिनाचे औचित्य साधून ५ सप्टेंबर रोजी कैलाश शिल्प, छत्रपती संभाजीनगर येथे स्पर्धेतील उत्कृष्ट कलाकृती साकारणाऱ्या २३ विद्यार्थ्यांचा ट्रॉफी, प्रशस्तीपत्र आणि स्कूल बॅग देऊन गौरव करण्यात आला. कार्यक्रमास जिल्हा परिषदेच्या माध्यमिक शिक्षणाधिकारी अश्विनी लाठकर प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होत्या. अध्यक्षस्थानी छत्रपती संभाजीनगर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक प्रकाश जाधव होते. अपर पोलीस अधीक्षक प्रशांत स्वामी, उपविभागीय पोलीस अधिकारी पूजा नांगरे आणि आर्थिक गुन्हे शाखेचे पोलीस उपअधीक्षक सूर्यकांत कोकणे यांची प्रमुख उपस्थिती होती.

पोलीस निरीक्षक आनंद झोटे यांनी कार्यक्रमाचे नियोजन केले. विद्यार्थ्यांनी आपल्या चित्रांमधून हेल्मेट व सीट बेल्टचा वापर, वाहतूक नियमांचे पालन, सिग्नलचे पालन, वेगावर नियंत्रण तसेच वाहन चालविताना मोबाईलचा वापर टाळण्याचा संदेश प्रभावीपणे मांडला. काही चित्रांमध्ये रस्ते अपघातांचे वास्तव व त्याचे परिणाम दाखविण्यात आले, तर काही कलाकृतींमधून वाहतूक नियमांचे पालन केल्यास अपघात टाळता येऊ शकतात, हा सकारात्मक संदेश देण्यात आला.

यावेळी मार्गदर्शन करताना पोलीस अधीक्षक प्रकाश जाधव यांनी रस्ता सुरक्षा हा प्रत्येक नागरिकाच्या जीवनाशी जोडलेला विषय असल्याचे सांगितले. एवढ्या मोठ्या संख्येने विद्यार्थ्यांनी चित्रकला स्पर्धेत सहभाग घेऊन रस्ता सुरक्षेचा संदेश दिल्याबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले. हेल्मेट, सीट बेल्ट, वाहतूक नियमांचे पालन, वेगावर नियंत्रण आणि वाहन चालविताना मोबाईलचा वापर न करणे या बाबी प्रत्येकाने दैनंदिन जीवनाचा भाग बनवाव्यात, असे आवाहन त्यांनी केले.

प्रमुख अतिथी अश्विनी लाठकर यांनी विद्यार्थ्यांच्या कलाकृतींचे कौतुक करताना त्यांच्या चित्रांमध्ये कलागुणांसोबतच रस्ता सुरक्षेबाबतची संवेदनशीलता दिसून येत असल्याचे सांगितले. विद्यार्थ्यांच्या माध्यमातून सुरक्षित वाहतुकीचा संदेश पालकांपर्यंत आणि समाजातील विविध घटकांपर्यंत पोहोचविण्याचा हा उपक्रम प्रभावी असल्याचे त्यांनी नमूद केले.

पोलीस अधीक्षक कार्यालयात कलाकृतींचे प्रदर्शन

स्पर्धेतील उत्कृष्ट कलाकृतींचे पोलीस अधीक्षक कार्यालयाच्या दर्शनी भागात प्रदर्शन भरविण्यात आले आहे. या कलाकृतींची पाहणी अश्विनी लाठकर आणि प्रकाश जाधव यांनी विद्यार्थ्यांसमवेत केली. यावेळी विद्यार्थ्यांनी आपल्या चित्रामागील संकल्पना व त्यातून दिलेला संदेश मान्यवरांना सांगितला.

या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांना पोलीस अधीक्षक कार्यालयातील विविध शाखांच्या कामकाजाची माहितीही देण्यात आली. नियंत्रण कक्ष, डायल-११२ आपत्कालीन प्रतिसाद यंत्रणा, सायबर शाखा, बॉम्ब शोधक व नाशक पथक तसेच इतर महत्त्वाच्या शाखांना विद्यार्थ्यांनी भेट देऊन पोलिसांची कार्यप्रणाली जाणून घेतली.

**गौरविण्यात आलेले विद्यार्थी** : शेख आशिया रशीद, दिव्या बाबासाहेब कडे, मानसी संदीप सोगाडे, लुबना मन्सूर पठाण, हिंदवी दिलीप चव्हाण, कार्तिक विठ्ठल कोरडे, पुनम भाऊसाहेब मानकापे, समृद्धी सुरेश इंगळे, श्रेया अशोक गायकवाड, समृद्धी गणेश घडमोडे, अंश इंदलसिंग राजपूत, वेदांत शरद पवार, रितिका सदाशिव शिंदे, साक्षी कैलास जाधव, शुभम मोहन मालपुरे, अक्षरा सोमनाथ काटकर, भक्ती कृष्णा मिसाळ, अनन्या अरुण सोनवणे, दिव्या प्रकाश चंदेल, आराध्या गणेश सोमवंशी, समृद्धी काकासाहेब पठाडे आणि वेदांती प्रकाश कुमावत यांचा समावेश आहे.

# 'ऊर्जा क्षेत्र २०४७'चा वेध; दराडे विद्यालयाच्या अंजली ढगेची यशस्वी भरारी

## तालुकास्तरीय विज्ञान मेळाव्यात द्वितीय क्रमांक; प्रभावी सादरीकरणाने वेधले परीक्षकांचे लक्ष



**हिंगोली** : भारतीय विद्या मंदिर शिक्षण संस्था संचलित श्रीमती शांताबाई मुंजाजी दराडे माध्यमिक विद्यालय, हिंगोली येथील विद्यार्थिनी कु. अंजली दिनकर ढगे हिने अखिल भारतीय विद्यार्थी विज्ञान मेळावा २०२६ अंतर्गत आयोजित तालुकास्तरीय विज्ञान मेळाव्यात द्वितीय क्रमांक पटकावत उल्लेखनीय यश संपादन केले.

**विज्ञान मेळाव्याचा मुख्य विषय 'भारतीय ऊर्जा क्षेत्र २०४७** : भविष्याचा वेध – संधी आणि आव्हाने' हा होता. या विषयावर अंजलीने अभ्यासपूर्ण मांडणी करत भारताच्या भविष्यातील ऊर्जा क्षेत्रातील संधी, आव्हाने आणि बदलत्या ऊर्जा गरजांचा वेध घेतला. तिच्या आत्मविश्वासपूर्ण व प्रभावी सादरीकरणाने परीक्षकांचे लक्ष वेधून घेतले.

या उल्लेखनीय यशाबद्दल विद्यालयाचे मुख्याध्यापक तथा हिंगोली जिल्हा मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष डॉ. प्रकाश अंभोरे व उपमुख्याध्यापक श्री. अनिल लोळेवार यांनी अंजलीचा पुष्पहार घालून सत्कार केला. विज्ञान मेळाव्याच्या तयारीसाठी विद्यालयातील विज्ञान व गणित विषयाच्या सर्व अध्यापकांनी तिला मार्गदर्शन केले.

अंजली ढगे तसेच तिला मार्गदर्शन करणाऱ्या अध्यापकांचे भारतीय विद्या मंदिर शिक्षण संस्थेचे अध्यक्ष प्रा. मदन मार्डीकर, सचिव ॲड. गयबाराव नाईक तसेच संस्थेच्या सर्व सन्माननीय संचालकांनी अभिनंदन करून पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

अंजलीच्या या यशामुळे दराडे विद्यालयाच्या शैक्षणिक व वैज्ञानिक उपक्रमांच्या यशात आणखी एक मानाचा तुरा खोवला गेला असून, तिच्या कामगिरीचे शिक्षक, विद्यार्थी व पालकवर्गातून कौतुक होत आहे.

# रोटरी क्लबतर्फे शिक्षकांचा गौरव

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी** : शनिवारी, ५ सप्टेंबर रोजी शिक्षण दिनानिमित्त प्राईम स्टार इंग्लिश शाळेमध्ये रोटरी क्लब आणि मायनॉरिटी डेव्हलपमेंट फ्रंटच्या वतीने मोफत आरोग्य आणि नेत्र तपासणी तपासणी शिबीर आयोजित करण्यात आले होते. याप्रसंगी रोटरी क्लबच्या वतीने गुणवंत शिक्षकांना पारितोषिके देवून गौरविण्यात आले. यानिमित्त शिक्षणाचे आणि आरोग्याचे महत्व यावर चर्चासत्र आयोजित करण्यात आले होते. यात अल्पसंख्यांक संशोधन व प्रशिक्षण संस्थेचे शासकीय सल्लागार (मार्टी) रशीद शेख यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. यावेळी प्रमुख उपस्थिती लायन्स क्लबचे छत्रपती संभाजी नगरप्रमुख जोशी, किरण कुमार धोत्रे, जिया आणि इतर गणमान्य अतिथी यांची उपस्थिती होती.

# गंगापूर येथे संघर्षयोद्धा मनोज जरांगे पाटील यांच्या समर्थनार्थ रास्तारोको आंदोलन




गंगापूर प्रतिनिधी : मराठा समाजाच्या विविध मागण्यांसाठी तसेच संघर्षयोद्धा मनोज जरांगे पाटील यांच्या समर्थनार्थ गंगापूर येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकात ५ सप्टेंबर रोजी सकाळी ११०० वाजता सकल मराठा समाजाच्या वतीने रास्तारोको आंदोलन करण्यात आले मागण्याचे निवेदन महसुल मंडळधिकारी शुभांगी शिंदे व पोलिस निरीक्षक सलीम चाऊस यांना सादर करण्यात आले.दरम्यान आंदोलकांनी रुग्नवाहीकेस रस्ता मोकळा करून देण्यात आला.

मराठा समाजाच्या विविध मागण्यांसाठी तसेच संघर्षयोद्धा मनोज जरांगे पाटील यांच्या समर्थनार्थ गंगापूर येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकात रास्तारोको आंदोलन करण्यात आले अर्धा तास चाललेल्या आंदोलनात "एक मराठा, लाख मराठा!" तसेच "मनोज जरांगे पाटील यांच्या समर्थनार्थ सकल मराठा समाज एकवटला!" आरक्षण आमच्या हक्काचे अशा घोषणा देण्यात आल्या यावेळी सकल मराठा बांधवांची मोठ्या संख्येने उपस्थीती होती

यावेळी पोलीस निरीक्षक सलीम चाऊस यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीसांनी चोख बंदोबस्त ठेवला होता.

# ई-सूची ॲपद्वारे आरोग्य सेवा डिजिटल करण्यास जिल्ह्यात सुरुवात

## 27 लाख कुटुंबांचे सर्वेक्षण; 16 हजार गरोदर मातांची नोंदणी; 3 लाख नवीन ABHA निर्मिती

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी



**छत्रपती संभाजीनगर** : नागरिकांना अधिक सुलभ, पारदर्शक, गतिमान आणि आधुनिक आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात 'ई-सूची' ॲपच्या माध्यमातून आरोग्य सेवांचे डिजिटलायझेशन करण्यास सुरुवात झाली आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी मिन्नू पी. एम. यांच्या मार्गदर्शनाखाली आणि जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अभय धानोरकर यांच्या नेतृत्वाखाली या उपक्रमाची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येत आहे.

'ई-सूची' ॲपच्या माध्यमातून कुटुंब सर्वेक्षण, माता व बाल आरोग्य, कुटुंब नियोजन, लसीकरण, असंसर्गजन्य आजार, क्षयरोग आदी राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रमांशी संबंधित माहिती डिजिटल स्वरूपात नोंदविण्यात येत आहे. त्यामुळे आरोग्य कर्मचाऱ्यांना आवश्यक माहिती एकाच डिजिटल माध्यमातून उपलब्ध होण्यास मदत होत आहे.

जिल्ह्यात आतापर्यंत २७ लाख कुटुंबांचे सर्वेक्षण, १६ हजार गरोदर मातांची नोंदणी करण्यात आली असून, 'ई-सूची' ॲपच्या माध्यमातून ३ लाख नवीन ABHA तयार करण्यात आले आहेत. कुटुंब सर्वेक्षण, कुटुंब नियोजन तसेच माता व बाल आरोग्य कार्यक्रमांची डिजिटल नोंदणी पूर्ण झाली असून, लसीकरण, असंसर्गजन्य आजार, क्षयरोग आदी कार्यक्रमांची डिजिटल नोंदणी व माहिती संकलनाचे काम सुरू आहे. यापुढे ABHA (आयुष्मान भारत हेल्थ अकाउंट)च्या माध्यमातून 'ई-सूची' ॲपला विविध राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रमांच्या डिजिटल प्रणालीशी जोडण्याच्या दृष्टीने कार्यवाही करण्यात येणार आहे. त्यामुळे नागरिकांच्या आरोग्यविषयक माहितीचा आवश्यकतेनुसार डिजिटल पद्धतीने वापर करणे तसेच संबंधित यंत्रणांमध्ये माहितीची देवाणघेवाण करणे अधिक सुलभ होणार आहे. या डिजिटल प्रणालीमुळे आरोग्य सेवांचे नियोजन, लाभार्थींचा मागोवा, सेवा वितरण, उपलब्ध सुविधांचे निरीक्षण आणि विविध आरोग्य कार्यक्रमांचा आढावा घेणे अधिक कार्यक्षम होणार आहे. कागदी नोंदीवरील अवलंबित्व कमी होऊन वेळेची बचत होण्यासोबतच आरोग्य व्यवस्थेतील पारदर्शकता आणि कार्यक्षमताही वाढण्यास मदत होणार आहे. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याच्या ग्रामीण तसेच शहरी भागात 'ई-सूची'च्या माध्यमातून कुटुंब सर्वेक्षण आणि ABHA निर्मितीचे काम आशा कार्यकर्त्यांमार्फत सुरू आहे. त्यामुळे नागरिकांनी आपल्या कार्यक्षेत्रातील आशा कार्यकर्त्यांना आवश्यक माहिती देऊन सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हा आरोग्य विभागाच्या वतीने करण्यात आले आहे.

# एलोरा इंग्रजी हायस्कूलमध्ये शिक्षक दिन ; विद्यार्थ्यांनी साकारली एक दिवसासाठी शिक्षकांची भूमिका

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी




**छत्रपती संभाजीनगर** : बीड बायपास रोडवरील एलोरा इंग्रजी हायस्कूल व ज्युनिअर कॉलेजमध्ये शिक्षक दिनानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या प्रारंभी शाळेच्या मुख्याध्यापिका संगीता शिंदे यांच्या हस्ते भारताचे माजी राष्ट्रपती व महान शिक्षणतज्ज्ञ डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी सबा रिझवी यांनी विद्यार्थ्यांना शिक्षक दिनाचे महत्त्व आणि शिक्षकांच्या कार्याची भूमिका याबाबत मार्गदर्शन केले. शिक्षकांप्रती आदर, कृतज्ञता आणि शिक्षणाचे महत्त्व विद्यार्थ्यांनी समजून घेण्याचे आवाहन त्यांनी केले.

शिक्षक दिनानिमित्त विद्यार्थ्यांनी एक दिवसासाठी शिक्षकांची भूमिका पार पाडत अध्यापनाचा अनुभव घेतला. यामध्ये श्रेयस अडसूळ, निरमा चौधरी, कामाक्षी देशमुख, जान्हवी बेदवे, आदित्य घुसिंगे, अंजली गिरी, झैद सय्यद, अभिनव उजागरे, पार्थ भैरट, नेहा सुतावणे, सलौनी पवार, श्रेयस ध्रुतराज, श्रेया घुसिंगे, अब्दुल हादी खान, प्रणिता म्हस्के, स्वामीराज लवगळे आणि तन्वी दीक्षित या विद्यार्थ्यांनी विशेष भूमिका बजावली.

विद्यार्थ्यांनी शिक्षकांची जबाबदारी उत्साहाने पार पाडत अध्यापन कौशल्याचे सादरीकरण केले. त्यांच्या उत्कृष्ट कार्याचे कौतुक करत मुख्याध्यापिका संगीता शिंदे तसेच हरजीतकौर सौदी, निलाक्षी राव, अश्विनी काळे, सुहास भानप, सुवर्णा जोशी आणि मनिषा फुलारे यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.

# शिक्षक दिनानिमित्त 'रंगदृष्टी' कार्यक्रम उत्साहात

छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी


शिक्षक दिनाचे औचित्य साधून डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या प्रदर्शिक कला विभागात 'रंगदृष्टी' या अभिनव उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. नवीन विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यासोबतच त्यांच्या अंगभूत कलागुणांना वाव आणि सर्जनशीलतेला प्रोत्साहन तसेच विद्यार्थ्यांना कलात्मक अभिव्यक्तीसाठी व्यासपीठ उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने हा उपक्रम सुरू करण्यात आला असल्याचे विभागप्रमुख प्रा. डॉ. वैशाली बोदेले यांनी सांगितले.

विद्यापीठाच्या परीक्षा नियंत्रक व मूल्यमापन विभागाचे प्रमुख डॉ. बाबासाहेब डोळे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. आपल्या मनोगतात डॉ. डोळे यांनी विद्यार्थ्यांना ज्ञान, कला, विज्ञान आणि तंत्रज्ञान यांची सांगड घालून सर्जनशीलतेचा विकास करण्याचा हितोपदेश केला. फिजिक्स आणि ड्रामा यांचा संबंध जवळचा आहे. कला आत्मसात करताना विद्यार्थ्यांनी तन-मन-धनाने ज्ञानग्रहण केले पाहिजे. कलित कला, साहित्य, विज्ञान, तत्त्वज्ञान आणि तंत्रज्ञान यांची सांगड घातली पाहिजे. विद्यार्थ्यांनी शास्त्रातून शास्त्र शिकत असतानाच अंतःकरणातून रंग आणि कलाविष्कार व्यक्त करण्याची क्षमता विकसित करावी, असे डोळे म्हणाले.

प्रा. डॉ. स्मिता साबळे यांनी शिक्षक कसा असावा, याचे उदाहरण देताना प्रा. डॉ. रुस्तुम अचलखांब, शशिकांत बऱ्हाणपूरकर, डॉ. कुमार देशमुख, सीने अभिनेत्री गीता अग्रवाल यांचा उल्लेख केला. या शिक्षकांसारखी सर्जनशिलता विद्यार्थ्यांनी आत्मसात करावी, असा सल्ला साबळे यांनी दिला.

# जैन संघटनेचे अध्यक्षपदी मा. आ.पोखर्णा तर सरचिटणीसपदी प्रदीप गोलेच्छा यांची बिनविरोध निवड

हिंदू प्रकाश वार्ता/ प्रतिनिधी



**परभणी**:-,,जैन समाजातील उद्योजक व्यवसायिक व महिला उद्योजकांसाठी व्यवसाय वृद्धी आणि नेटवर्किंग चे प्रभावी व्यासपीठ निर्माण करण्याच्या उद्देशाने जैन इंटरनॅशनल ट्रेड ऑर्गनायझेशन ( जितो ) च्या परभणी नांदेड विभागाचा पदग्रहण सोहळा अक्षदा मंगल कार्यालय ते मोठ्या उत्साहात पार पडला यावेळी रूम घेऊन चे अध्यक्ष राजेंद्र जैन यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या सभेत जीतो परभणी नांदेड विभागाच्या अध्यक्षपदी माजी आमदार ओमप्रकाश पोखरणा तर सरचिटणीस पदी प्रदीप गोलेच्या यांची बिनविरोध निवड करण्यात आली यावेळी सोहळ्यात जितोचे अपेक्षे अध्यक्ष विजय भंडारी अपेक्षा डायरेक्टर राजेश कुमार साकला रूम झोनचे सरचिटणीस तो तृप्ती करणेवट व रोमझॉन चेअरमन रवी शिवण सरा यांची प्रमुख उपस्थिती होती परभणी व नांदेड येथे जितो विभाग सुरू करण्यासाठी गेल्या अनेक वर्षापासून सुरू असलेल्या प्रयत्नांना मूर्त स्वरूप मिळाले असून या भागातील उद्योजकांना प्रगतीला मोठा गती मिळणार आहेत नवीन कार्यकारिणी अशा प्रकारे कोषाध्यक्ष ॲड झुंबरलाल मुथा उपाध्यक्ष प्रशांत कळमकर सचिव राजेंद्र पोखरणा अभय जैन संयुक्त कोषाध्यक्ष सतीश शिंगवी संजय भंडारी व युवा विंग चेअरमनपदी हर्ष जैन उपाध्यक्षपदी अमनमुथा प्रसाद कांकरिया जिनेश मुथा ऋषभ भाटिया आनंद जैन राहुल गुगलीया गगन जैन लेडीज वीग अध्यक्षपदी सीएस प्रियदर्शनी जैन सदस्य पदी एडवोकेट प्रियंका लुक्कड आयुषी मुथा प्राची जैन डॉक्टर नेहा मोता स्नेहा गोलेच्छा रोशनी जैन प्रियंका राका कोमल लोखंड यांची बिनविरोध निवड करण्यात आली.

# शिक्षक दिनानिमित्त एमजीएममध्ये पाककलेचा अनोखा उत्सव

## विविध राज्यांतील पारंपरिक पदार्थ सादर करत शिक्षकांनी दाखविले पाककौशल्य

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी



**छत्रपती संभाजीनगर** : शिक्षक दिनानिमित्त महात्मा गांधी मिशन विद्यापीठाच्या इन्स्टिट्यूट ऑफ हॉटेल मॅनेजमेंटतर्फे आगळावेगळा पाककला उत्सव आयोजित करण्यात आला. या उपक्रमात विद्यापीठाचे कुलगुरू, अधिष्ठाता, संचालक, विभागप्रमुख, प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेत विविध खाद्यपदार्थ तयार करून पाककौशल्याचे दर्शन घडविले.

या उपक्रमात चपाती, पराठे, पुलाव, रस्सम, डाळ-खिचडी, पिझ्झा, पास्ता तसेच विविध प्रकारच्या भाज्यांसह अनेक रुचकर पदार्थ तयार करण्यात आले. विशेष म्हणजे, एमजीएम विद्यापीठात देशातील विविध राज्यांमधून शिक्षक कार्यरत असल्याने त्यांनी आपापल्या राज्यांची खाद्यसंस्कृती आणि पारंपरिक पदार्थ सादर केले. त्यामुळे उपक्रमातून भारताच्या 'विविधतेतील एकते'चे दर्शन घडले.

सर्व सहभागींच्या पदार्थांचे प्रदर्शनही भरविण्यात आले. विविध रंग, स्वाद आणि प्रांतांच्या खाद्यसंस्कृतीने सजलेले हे प्रदर्शन उपस्थितांचे आकर्षण ठरले. त्यानंतर हे पदार्थ प्राध्यापक, कर्मचारी आणि विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देण्यात आले.

कुलगुरू डॉ. विलास सपकाळ, अधिष्ठाता डॉ. रेखा शेळके, डॉ. प्राप्ती देशमुख, डॉ. जॉन चेल्लादुराई, शुभा महाजन, उपकुलसचिव प्रो. डॉ. परमिंदर कौर धिंग्रा, संचालक डॉ. कपिलेश मंगल यांच्यासह विविध विभागांचे संचालक, विभागप्रमुख, प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

संचालक डॉ. कपिलेश मंगल यांनी अशा नावीन्यपूर्ण उपक्रमांना कुलपती अंकुशराव कदम, कुलगुरू प्रा. डॉ. विलास सपकाळ आणि कुलसचिव डॉ. आशिष गाडेकर यांचे सातत्याने प्रोत्साहन व मार्गदर्शन मिळत असल्याचे सांगितले.


**मुख्य कार्यालय : ऑफिस नं. 515, 5 वा मजला, वास्तू इलाईट स्क्वेअर, बजाज हॉस्पिटल समोर, बीड बायपास रोड, छत्रपती संभाजीनगर- 431010**

हे पत्र प्रकाशक, मालक श्री. रोहित विकास पाटील यांनी मुद्रक श्री. सय्यद परवेझ अहेमद सय्यद इनायत अली यांच्यामार्फत रेड प्रिंटस् , सी-15, संजयनगर, बायजीपुरा, छत्रपती संभाजीनगर-431001 येथे छापून तिरुपती सुप्रीम एन्क्लेव्ह, जालान नगर, छत्रपती संभाजीनगर- 431001 येथून प्रकाशित केले. ▌संपादक : रोहित विकास पाटील ▌email : hinduprakashvarta@gmail.com ▌epaper.hinduprakashwarta.com ▌PRGI No.: MHMAR/25/A2358 ▌संपर्क क्र. : 7261999911